रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १६५ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल
रायगड, बुधवार, दि. १३ नोव्हेंबर २०२४
किंमत ४ ₹

## तलवारीच्या धाकाने हप्तेवसुली

**पनवेल :** शहरातील कोकण फुड हॉटेल येथील मॅनेजरला एका सराईत गुन्हेगाराने त्याच्याकडे असलेल्या तलवारीने धमकावून दर महिन्याला हप्ता देण्याची मागणी केली. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे. तकदीर साळुंखे (रा. नवनाथनगर झोपडपट्टी) याने कोकण फुड हॉटेलचा मॅनेजर चंदन श्यामराव (३४) याच्याकडे फुकटची बिअर मागितली असता बिअर देण्यास मॅनेजरने नकार दिला. म्हणून मॅनेजरला शिवीगाळ व धक्काबुक्की करून काऊंटरवरील स्वॅप मशीन फेकून मारले. तसेच हातामध्ये नंगी तलवार घेऊन धमकाविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या पथकाने आरोपीला ताब्यात घेतले.

## आ. दळवींकडून आश्वासनांचा पाऊस

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

येणाऱ्या काळात निधी प्राप्त करून किनारी पर्यटकांसाठी सज्ज होईल, मुरूडच्या विकासासाठी या परिसरात उद्योग आणणार, दिघी पोर्टचा प्रकल्प जलद गतीने होईल, अशा अनेक आश्वासनांचा पाऊस आमदार दळवी यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाडला. करोडो रुपयांचा निधी आणून विकास केल्याच्या बातादेखील आमदारांनी मारल्या. मात्र, मागील पाच वर्षांत मुरूडमधील पर्यटनाबरोबरच येथील तरुणांच्या रोजगाराचे प्रश्न सोडविण्यात दळवी उदासीन ठरल्याची प्रतिक्रिया अनेक तरुणांनी व्यक्त केली.


मागील पाच वर्षांत सरकारच्या माध्यमातून मुरूडचा सर्वांगीण विकास केला. पर्यटनाला चालना देण्यासाठी किनारी सुशोभिकरण करण्यासाठी सुखसुविधा असाव्यात, त्यासाठी प्रयत्न करणार, मुरूड शहरासाठी २८७ कोटींहून अधिक निधी दिला. दहा हजार कोटींहून अधिक निधी ग्रामीण भागासाठी दिला. त्यामुळे या भागात प्रकल्प आल्यास ग्रामपंचायतींचा विकास निश्चित होईल, असे आश्वासन दळवी यांनी दिले. परंतु, करोडो रुपयांचा निधी आणूनदेखील मुरूडमधील अनेक गावे आजही पाण्यापासून वंचित आहेत. येथील तरुणांना रोजगार नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येत आहे. मुरूड तालुक्यातील अनेक गावांमधील जलजीवन योजना रखडल्या आहेत. निधीअभावी अनेक विकासकामे रखडली आहेत. त्यामुळे आमदारांनी आणलेला करोडो रुपयांचा निधी कुठे गेला, असा प्रश्न स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. मुरूड पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे शहर आहे. परंतु, येथील पर्यटनवाढीला चालना देण्यास दळवी अपयशी ठरले आहेत. आगरदांडा, रेवस-करंजा, साळाव पुलाचे काम गेल्या अनेक वर्षांपूर्वीच मंजूर झाले आहे. परंतु, ही कामे आपणच आणली अशा बतावण्या करीत आ. दळवी सर्वसामान्यांची दिशाभूल करीत असल्याचे तेथील स्थानिकांकडून सांगण्यात आले आहे. अलिबाग, मुरूड व श्रीवर्धन तालुक्यातील खाडीमध्ये उभारण्यात येणाऱ्या पुलांचे भूमीपूजन करण्यात आले. मात्र, हे पूल उभारताना स्थानिक मच्छिमारांना विश्वासात घेतले नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.




# साहेबांची जीभ घसरली

## असंस्कृत दळवींना सत्तेचा माज

## ज्येष्ठ नेत्यांबद्दल आक्षेपार्ह विधान




**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रविधानसभानिवडणुकीची घोषणा झाली आहे. या महासंग्रामासाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार असून, २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होईल. राज्यात गेल्या दोन-अडीच वर्षांत बदललेली राजकीय समीकरणं, गद्दारी, बंडखोरी यांच्यासाठी ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची आहे. सध्याच्या सरकारचं गलिच्छ राजकारण संपुष्टात आणण्यासाठी महाविकास आघाडी सर्व ताकदीनं उतरली आहे. मात्र, विरोधकांनी राजकारणाची परिभाषा बदलून त्याला असंस्कृतपणाची करुन टाकली आहे. वयाचा मान न ठेवता, खालच्या पातळीवर जात विरोधी नेते सत्तेचा माज दाखवत ज्येष्ठ नेत्यांबद्दल आक्षेपार्ह विधान करीत आहेत. देशाच्या नेत्यांना त्यांच्या वयाचा दाखला देत पुढच्या निवडणुकीत ते नसतील, असं बोलून असंस्कृत महेंद्र दळवी यांनी संपूर्ण महाराष्ट्राच्या भावना दुखावल्या आहेत.

> महाविकास आघाडीचे नेतृत्व करणारे ज्येष्ठ नेते देशाच्या राजकारणात सर्वोच्च स्थानी असणारे लोकप्रतिनिधी आहेत. राष्ट्रवादीचे सर्वे सर्वा शरद पवारसाहेब हे विकासात्मक दृष्टिकोन असणारे नेते आहेत. केवळ महाराष्ट्र नाही, तर देशपातळीवर साहेबांना मानणाऱ्या वर्गामध्ये विरोधकदेखील आहेत. शरद पवार नावाचे सुसंस्कृत विचार समाज घडवतात. हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. शरद पवार नावाचे विचार समाजात जागृत राहिले आहेत. म्हणूनच तर त्यांना जाणता राजा ही उपाधी देण्यात आली आहे. ज्येष्ठ नेत्यांवर टीका करून निवडणूक जिंकण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना मतदारांनी जागा दाखवावी.
>
> – लवेश नाईक, जिल्हाध्यक्ष, ओबीसी सेल, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

महेंद्र दळवी यांनी एका वाहिनेला दिलेल्या मुलाखतीत महाविकास आघाडीच्या नेत्यांचे वय बघता ही त्यांची शेवटची निवडणूक असल्याचे म्हटले आहे. शिंदे गटाचे बंडखोर आमदार महेंद्र दळवी यांनी महाविकास आघाडीच्या ज्येष्ठ नेत्यांबाबत आक्षेपार्ह विधान करीत टीका केली. त्यांच्या या वक्तव्यानंतर महाविकास आघाडीतील कार्यकर्त्यांनी प्रचंड संताप व्यक्त केला आहे. तसेच त्यांनी नाराजी व्यक्त करत अशा प्रकारची भाषा खपवून घेतली जाणार नसल्याचं म्हटलं. दळवींचं वक्तव्य हे अत्यंत चुकीचं व निंदनीय आहे. अशा पद्धतीने खालच्या पातळीवर ज्येष्ठ नेत्यांवर टीका करणं कार्यकर्त्यांना पूर्णपणे अमान्य आहे. ही आपल्या महाराष्ट्राची संस्कृती नसल्याचंही कार्यकर्त्यांनी म्हटलं आहे.

शरद पवार, नाना पटोले यांचा झंझावात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराने चांगलाच वेग घेतला आहे. राज्यातील प्रमुख नेते एका दिवशी चार-चार सभांना संबोधित करत आहेत. यामध्ये खासदार शरद पवार, शेकाप नेते आ. जयंत पाटील, काँग्रेसचे नेते नाना पटोले हेदेखील मागे राहिलेले नाहीत. आगामी काळात शरद पवार पूर्ण ताकदीने प्रचार करणार आहेत. ते पुढच्या दहा दिवसांत, म्हणजेच १८ नोव्हेंबरपर्यंत तब्बल ३६ सभांना संबोधित करणार आहेत. तरुणांनाही लाजवेल असा धडाका महाविकास आघाडीच्या ज्येष्ठ नेत्यांनी लावला आहे. परंतु, पराभव समोर दिसत असल्यामुळे विरोधक सैरभैर झाले असून, बेताल वक्तव्य करीत असल्याचा आरोप नागरिकांडून केला जात आहे.

**आजचा अग्रलेख**
**बोलणाऱ्यांची तोंडे..**

## वेधक

### सुरेश लाडांना बँकेची नोटी



**कर्जत :** कर्जत विधानसभेचे माजी आमदार आणि भाजपचे नेते सुरेश लाड यांनी रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे कर्ज घेतले होते. त्यांच्यावर मुद्दलाच्या रकमेवर व्याज वाढले असून, त्यांना बँकेच्या वतीने १०१ ची नोटीस बजावण्यात आली आहे.

सुरेश लाड तीन यांनी स्वतः आणि पत्नी आणि पुतणे यांच्या नावावर रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेतले होते. व्याजासह ती रक्कम ६ कोटी ७२ हजार ८१७ रुपये •> पान ५ वर

### पवारांचा भुजबळांवर हल्लाबोल

**नाशिक :** आमच्या सहकाऱ्याने पक्ष फोडला, तेव्हा भुजबळ सकाळी आले, जे झालं ते वाईट झालं, समजूत काढायला जाऊ का, असं मला विचारलं. भुजबळ गेले ते परत आलेच नाही, आणि दुसऱ्या दिवशी शपथच घेतली, असे म्हणत भुजबळांवर शरद पवारांनी जोरदार हल्लाबोल केला. येवला येथील प्रचारसभेत ते बोलत होते. एखाद्या माणसानं चुकीचे काम करताना काही मर्यादा असतात, त्या भुजबळांनी शिल्लक ठेवल्या नाहीत, अशा लोकांना पुन्हा निवडून द्यायचं नाही, असे आवाहन पवारांनी केले.

### मोदींच्या सभेत मराठ्यांची घोषणाबाजी

**पुणे :** एसपी कॉलेज मैदानात नरेंद्र मोदींची सभा सुरु असताना एका मराठा बांधवाने मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन गोंधळ घातला. सभास्थळी नरेंद्र मोदी यांचं भाषण सुरु असताना व्हीव्हीआयपी रांगेतच काही प्रमाणत गोंधळ झाल्याचं पाहायला मिळालं. एक मराठा कार्यकर्ता उठला आणि एक मराठा लाख मराठा घोषणा देत त्याने सर्वांचं लक्ष वेधलं. पोलिसांनी त्या व्यक्तीला आवरलं आणि त्याला खाली बसायची विनंती केली होती.

## विमानतळ, अटल सेतू प्रकल्पग्रस्तांच्या त्यागाचे फलित

**। उरण । प्रतिनिधी ।**




- **सत्ताधाऱ्यांनी कामाचे श्रेय घेऊ नये**
- **शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांचा घणाघात**

आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि अटल सेतू हे आम्ही केले असे सत्ताधाऱ्यांकडून ठासून सांगितले जात आहे. पण, हे प्रकल्प येथील भूमीपुत्रांच्या आणि प्रकल्पग्रस्तांच्या त्यागावर निर्माण झाले आहे. प्रकल्पग्रस्तांच्या बलिदानाचा विसर पडणाऱ्यांना जनता नक्की धडा शिकवेल, असा घणाघात उरण शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांनी केला.

उरण विधानसभा मतदारसंघात निवडणुकीच्या प्रचारादरम्यान प्रीतम म्हात्रे यांनी विद्यमान आमदार महेश बालदी यांनी न केलेल्या कामांचा पाढा वाचला. जी विकासकामे विद्यमान आमदारांनी करायला पाहिजे होती, ती गेल्या पाच वर्षांत उरण शहर आणि तालुक्यात झालीच नाहीत. त्यामुळे उरण तालुका मागे पडला आहे; परंतु आता उरणच्या तरुणांच्यापाठीशीशेकापउभाराहिला असून, घाबरण्याचे दिवस गेले, असे आव्हान म्हात्रे यांनी दिले. उरण तालुक्यात म्हात्रे यांच्या प्रचाराचा झंझावात दिवसेंदिवस वाढत आहे. विधानसभेच्या निवडणुकीत प्रीतम म्हात्रे यांनी उडी घेतल्यामुळे उरण तालुक्यातील जुन्या आणि जाणत्या शेकाप कार्यकर्त्यांमध्ये स्फुरण चढले आहे. अशा परिस्थितीत म्हात्रे यांच्या प्रचाराला प्रतिसाद मिळत आहे. खरे तर नवी मुंबईत होणाऱ्या लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये लोकांना कामाला लावण्याचे खोटे आश्वासन सत्ताधारी देत आहेत. परंतु विमानतळ झाल्यावर आपल्याला तिकडे फिरकूदेखील देणार नाहीत. अशा परिस्थितीत आत्तापासूनच विमानतळामध्ये कामाला लागण्याची तयारी करण्याची गरज प्रीतम म्हात्रे यांनी व्यक्त केली.

गेल्या चार महिन्यांत जे.एम. म्हात्रे चॅरीटेबल ट्रस्टतर्फे प्रशिक्षण देऊन ४० जणांना मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये कामाला लावण्यास यश आल्याची माहिती म्हात्रे यांनी यावेळी दिली. •> पान ५ वर

## दळवींची खा. तटकरेंकडून कानउघडणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नगरपरिषदेवर प्रशासक असल्याने मला विकास करता आला, असे आ. दळवी त्यांच्या भाषणात बोलून गेले. दरम्यान, तटकरे यांनी दळवींना टोला लगावत दुजाभाव दाखवू नका, अशी कानउघडणी केली. त्यामुळे जमलेल्या कार्यकर्त्यांचे हसून पोट दुखू लागले. सभेला उपस्थित प्रेक्षकांची त्यामुळे करमणूक झाल्याचे चित्र पहावयास मिळाले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीची सभा मुरूड येथे पार पडली. या सभेत खासदार तटकरे यांनी त्यांच्या शैलीत बोलत असताना दळवींसह त्यांच्या समर्थकांची चांगलीच कानउघडणी केली.

> **आपले कान शाबूत ठेवा, हलक्या कानाचे राहू नका, असा सल्ला तटकरेंनी दळवींना दिला. कान भरणाऱ्यांचे ऐकू नका, असे म्हणत आमदारांचे कान टोचले. तटकरेंनी भाषणादरम्यान त्यांच्या शैलीत दळवी व त्यांच्या समर्थकांची उडवलेली खिल्ली उपस्थित प्रेक्षकांसाठी काही वेळ मनोरंजनाचे साधन बनले.**

व्यासपीठावरुन बोलताना लोकप्रतिनिधींनी तारतम्य बाळगून बोलावे, असेही तटकरे म्हणाले. आताची जनता सुज्ञ आहे, तुम्ही काय बोलता, कसे बोलता, तुम्ही भाषा कशी वापरता याकडे त्यांचे बारकाईने लक्ष असते. त्यामुळे भाषणातदरम्यान बोलताना दुसऱ्यांना वाईट वाटेल असे बोलू नका, अशी तंबीच थेट भरसभेत दळवींना दिली. तुमच्या बोलण्याने मतदार तुमची किंमत करतात, याची दखल घ्या, असेही ऐकवले. तटकरे भरसभेत दळवींच्या कार्यकर्त्यांचीही हजेरी घेतली. शिंदे गटाच्या उपप्रमुखावर तोंडसुख घेतले. काही वर्षांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये, त्यानंतर भाजप, शिवसेना अशा उड्या मारीत शिंदे गटात आल्याचे सांगताच सभेदरम्यान एकच हशा पिकला.

## थोरवेंच्या जाहीरनाम्याची घारेंकडून पोलखोल




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जतविधानसभामतदारसंघात विद्यमान आ. महेंद्र थोरवे यांनी २९०० कोटी रुपयांचा निधी आणला आहे. मात्र, ती कामे दिसत नसल्याने शासनाने त्या सर्व कामांचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करावे, अशी मागणी अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांनी सरकारकडे केली. तर, २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये महेंद्र थोरवे यांच्याकडून जाहीर केलेल्या जाहीरनाम्यामधील कोणतेही काम झाले नाही, असा आरोप करीत व्हिडीओ लावून त्या सर्व विकासकामांची पोलखोल घारे यांनी केली. •> पान ५ वर

## उसरोलीत शिंदे गटाला भगदाड

**शेकडो कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये प्रवेश**



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडी पुरस्कृत शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन मुरूड तालुक्यातील उसरोली येथील बेलीवाडीमधील दीडशेहून अधिक कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. या नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

बेलीवाडीमधील कार्यकर्ते शिंदे गटात कार्यरत होते. परंतु, शिंदे गटाच्या मनमानी कारभाराला कंटाळून कार्यकर्त्यांनी शेकापच्या लाल बावट्याच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्णय घेतला. सोमवारी दीडशेहूनअधिककार्यकर्त्यांनीशेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. गेल्या अनेक दिवसांपासून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराचा धडाका सुरु आहे. शेतकरी कामगार पक्षच विकास करू शकतो, ही भावना मनाशी ठेवून अलिबागसह रोहा, मुरूड तालुक्यातील शिंदे गटातील कार्यकर्ते शेतकरी कामगार पक्षात सामील होत आहेत. ऐन निवडणुकीत शेकापमध्ये कार्यकर्ते येत असल्याने शिंदे गटाचे उमेदवार दळवी यांना ही निवडणूक जड जाण्याची शक्यता आहे. चित्रलेखा पाटील यांचा विजय निश्चितच असल्याचा विश्वास •> पान ५ वर

## घोटवडेजवळ टेम्पोचा अपघात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाजन येथून अलिबागकडे जाणाऱ्या टेम्पोचा घोटवडेजवळ अपघात झाला. या अपघातामध्ये सातजण जखमी झाले आहेत. त्यामध्ये दोन लहान मुलांचा समावेश आहे. चालकाचा गाडीवरील ताबा सुटून मंगळवारी सकाळी रस्त्याच्या बाजूला असलेल्या विद्युत खांबाला जोरदार धडक लागली. त्यामध्ये गाडीचे नुकसान झाले असून, जखमींना अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपाचारासाठी दाखल केले आहे.

सध्याभातकापणीसहझोडणीचा हंगाम सुरु आहे. वेगवेगळ्या भागातील आदिवासीवाड्यातील मंडळींना रोजगाराचे साधन खुले झाले आहे. महाजने येथील दिवीवाडी येथील कामगारांना टेम्पोत घेऊन चालक विजय शिपाई वावे येथून •> पान ५ वर



### महिन्याभरापूर्वी घेतला होता टेम्पो

**शिक्षण असूनदेखील नोकरी नसल्याने वेगवेगळ्या गावांतील तरुण स्वतःचा लहान-मोठा व्यवसाय सुरु करीत आहेत. त्यामध्ये काही तरुण टेम्पो, मिनीडोअर चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. भेरसे येथील तरुण विजय शिपाई याने एक महिन्यापूर्वी टेम्पो विकत घेतला होता. यातून तो कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित असत. परंतु, मंगळवारी झालेल्या या अपघातामुळे चालकाच्या टेम्पोचे नुकसान होऊन वित्तहानीदेखील झाली आहे.**

## ट्रकच्या धडकेत टोलवसुली कर्मचारी ठार

**पनवेल :** रोडपाली येथील फुडलँड कंपनीसमोरील उड्डाणपुलावरुन भरधाव येणाऱ्या ट्रकने शनिवारी सायंकाळी ३२ वर्षीय टोल वसूल करणाऱ्या कर्मचाऱ्याला चिरडले. दोन वाहनांमध्ये हा कर्मचारी चिरडला गेला. घटनेनंतर धडक देणारा ट्रकचालक फरार झाला होता. ट्रकचालक कळंबोली पोलीस ठाण्यात हजर झाला. संदीप मिश्रा असे या मृत कर्मचाऱ्याचे नाव आहे.

रोडपाली येथील फुडलँड कंपनीसमोरील उड्डाणपुलावर सायंकाळच्यासुमारासनेहमीवाहतूक कोंडी असते. तळोजा औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांमधून एकाचवेळी सुटणाऱ्या वाहनांमुळे ही कोंडी होते. या पुलावरुन विरुद्ध दिशेनेसुद्धा वाहने पळविली जातात. नवी मुंबई वाहतूक पोलिसांच्या मागणीनंतर पनवेलमधील वाहतूक कोंडीवर पोलिसांना सहकार्यासाठी पालिकेने वार्डनची नेमणूक वाहतूक नियमनासाठी केली आहे. रोडपाली चौकात हे वार्डनही पोलिसांकडून तैनात केले असतात. संदीप मिश्रा हे एका अवजड वाहनाकडील टोलची पावती तपासत •> पान ५ वर

**चणेरा भागातील जनतेची फसवणूक, तरुणांच्या भावनांशी खेळ**

# मतांसाठी आमदारांचा खोटारडेपणा



## चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताईंचा हल्लाबोल

### ताईंची छकडीतून मिरवणूक

**चणेरा भागात प्रचारदरम्यान बाजार पेठेतून चिऊताई पाटील यांची छकड्यातून भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात आली. चिऊताईंनी सर्व मतदारांना अभिवादन करत आशीर्वाद मागितले. आपली लेक, आपली सूनबाई समजून चणेरावासियांनी ताईंचे जंगी स्वागत केले. दरम्यान, 'शिट्टी बजाव, गद्दार भगाव, चिऊताई आगे बडो, हम तुम्हारे साथ है', अशा घोषणा आणि शिट्टीच्या आवाजाने परिसर दुमदूमला होता.**

**। रोहा । वार्ताहर ।**

चणेरा भागात कारखाने आणू, आरसीएफ आणू, अशी फसवी आश्वासनं देऊन मागील निवडणुकीत मतं मिळवलीत. तरुणांना नोकरीचं आमिष दाखवून त्यांचे बायोडाटा गोळा केलेत. मात्र, पाच वर्षांत या भागात एकही कारखाना आला नाही. येथील जनतेच्या भावनांशी तुम्ही खेळला आहात. आपण केलेली फसवणूक •> पान ५ वर

> **महाआघाडी नेते मंडळींनी माझ्यावर विश्वास दाखवला आहे. तो सार्थ ठरवत मला तुमची सेवा करण्याची एक संधी द्या. मला या भागातील तरुणांच्या हाताला रोजगार द्यायचं आहे. या भागात सुसज्ज शाळा बांधायची आहे. महिलांसाठी बचत गट भवन बांधणार असून, महिलांचे सर्व प्रश्न मार्गी लावणार आहे.**
>
> **– चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई**




# कोट्यवधींच्या डिजिटल जाहिराती

## ■ भाजप आघाडीवर; तर काँग्रेस दुसऱ्या क्रमाकांवर

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा उडाला आहे. विविध पक्षांच्या, नेत्यांच्या दररोज प्रचारसभा, रॅली, मेळावे आयोजित केले जात आहेत. अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी राजकीय पक्षांकडून डिजिटल जाहिरातींवरही भर दिला जात आहे. त्यानुसार मागील १० दिवसांत राज्यात डिजिटल जाहिरातींवर ६.८० कोटी खर्च करण्यात आल्याचे गुगल ॲड्स ट्रान्सपरेन्सी सेंटरच्या आकडेवारीवरून समोर आले आहे.विधानसभेचे मतदान अवघ्या एका आठवड्यावर येऊन ठेपले आहे. विविध राजकीय पक्ष तसेच उमेदवारांकडून पारंपरिक प्रचारासोबतच डिजिटल जाहिरातींचाही वापर केला जात आहे.



डिजिटल माध्यमांवर व्हिडिओ, इमेज तसेच टेक्स्टद्वारे मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यानुसार १ ते ११ नोव्हेंबरपर्यंत राज्यात एकूण सहा कोटी ८० लाखांच्या डिजिटल जाहिराती प्रसारित करण्यात आल्या. त्यात भाजप पहिल्या क्रमांकावर असून काँग्रेस दुसऱ्या क्रमांकावर असल्याचे आकडेवारीवरून दिसते.

### जाहिरातींवर राजकारण्यांची मदार

| | | |
|---|---|---|
| एकूण जाहिराती | – | १०,६६२ |
| एकूण किंमत | – | ६,६८,७७,७५० |
| प्रमुख जाहिरातदार | | |
| भाजप | – | ३.६२ कोटी |
| काँग्रेस | – | १.५२ कोटी |
| शिवसेना शिंदे गट | – | ६०.४ लाख |
| राष्ट्रवादी अजित पवार गट | – | ५७.४ लाख |
| देवेंद्र फडणवीस | – | १५.३ लाख |
| एकनाथ शिंदे | – | १२.३ लाख |

### बारा लाख रुपयांची रक्कम पोलिसांनी केली जप्त

४ नोव्हेंबर – ४३.५ लाख
५ नोव्हेंबर– ७०.६ लाख
६ नोव्हेंबर–१.०३ कोटी
नोव्हेंबर–७३.३ लाख
८ नोव्हेंबर–७८ लाख
९ नोव्हेंबर–९५ लाख
१० नोव्हेंबर–१.१४ कोटी

# संविधान बदलण्याचा डाव ‘इंडिया’ने उधळून लावला

## शरद पवारांचे टीकास्त्र

। नाशिक । वृत्तसंस्था ।

मी दहा वर्षांत काय केले? अशी टीका पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री करत आहेत. मी कृषिमंत्री असताना ७१ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राज्यघटना बदलण्याचा त्यांचा डाव इंडिया आघाडीने उधळून लावला. महाविकास आघाडीकडून स्त्रियांना मोफत एसटी प्रवास, बेरोजगारांसाठी चार हजारांची आर्थिक मदत दिली जाईल,असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिले.

महायुती सरकारने राज्यात लाडकी बहीण योजना आणली खरी,दुसरीकडे तीन महिन्यांत ९७३ महिलांवर अत्याचार झाल्याची विदारक आकडेवारीही समोर आली आहे. महिला वर्गाचे रक्षण आणि संरक्षण करण्याऐवजी सत्ताधारी महायुतीने बघ्याची भूमिका घेतली आहे. सातशे शेतकऱ्यांच्या आत्म हत्यांमुळे राज्याची अवस्था काय सांगावी? अशा शब्दांत त्यांनी व्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली.

पवार म्हणाले, पाच वर्षांत टेक्स्टाईल पार्क झालेले नाही. कापसाला भाव मिळाला नाही. सरकार तुमच्या हातात असताना टेक्स्टाईल पार्क करू अशा घोषणा करण्यात आल्या पण प्रत्यक्षात काहीच झालेले नाही. गेल्या काही वर्षांपूर्वी कापसाला प्रतिक्विंटल सात हजार रुपये भाव द्यावा म्हणून त्यांनी आंदोलन केले. मात्र आता किती भाव? कापसाच्या भावासाठी आंदोलन करणारे तुमच्या तालुक्याचे मंत्री आता एक शब्दसुद्धा बोलत नाहीत. महाविकास आघाडीचे सरकार असताना कापसाला प्रतिक्विंटल दहा हजार हजार रुपये किमान भाव होता. मात्र आता भाव पडले आहेत, असे ते म्हणाले.

# निधी लाटणाऱ्यांना जागा दाखवा

## ■ संदेश पारकर यांचे आवाहन
## ■ पियाळी बौद्धविहार येथील सभेत राणेंवर टीका

। कणकवली । वृत्तसंस्था ।

आमदार नीतेश राणे यांनी बेंचेस घोटाळा करून कोट्यवधींचा मलिदा खाल्ला आहे. अशा प्रवृत्तींना या विधानसभा निवडणुकीत जागा दाखवा, असे आवाहन महाविकास आघाडी कणकवली विधानभा मतदारसंघाचे उमेदवार संदेश पारकर यांनी केले. पारकर हे पियाळी गावातील बुद्धविहार येथे झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष अनंत पिळणकर, सुनील कदम, प्रवीण कदम, संजय बंदरकर, राहुल कदम, विकास कदम, शरद नारकर आदी उपस्थित होते.



पारकर म्हणाले, केवळ तीन ते चार हजार रुपयांना मिळणारी बेंचेस, राणे यांनी आपल्या ठेकेदारामार्फत १२ हजार रुपयांना घेण्यास समाजकल्याण विभागाला भाग पाडले. एवढेच नव्हे तर समाजकल्याण खात्याच्या निधीतून आलेल्या या बेंचेसवर आपले नाव टाकले. आम्ही आंदोलन, मोर्चा काढल्यानंतर ही नावे हटविली. अजूनही काही बेंचवर राणेंचे नाव आहे. या योजनेत भ्रष्टाचार करून मिळविलेला पैसा राणे आता निवडणुकीत वापरत आहेत. राणेंचे कार्यकर्ते रात्री अपरात्री येऊन पैसे वाटप करत आहेत. मात्र, अशांना गावातून पळवून लावायला हवे.

या सभेवेळी पियाळी येथील सामाजिक कार्यकर्ते समीर तेली, विश्वनाथ कदम, संजय कदम, भाऊ कदम, प्रवीण कुडतरकर, रवींद्र गुरव, मधुकर गुरव, बबन नारकर, बाळा नारकर, सिद्धेश राणे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.दरम्यान, तोंडवली येथील प्रचार सभेवेळी पारकर यांच्यासमवेत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष अनंत पिळणकर, प्रवीण कुडतरकर, प्रवीण गुरव, समीर तेली, संजय बंदरकर, सिद्धेश राणे, तात्या निकम, आबू मेस्त्री आणि तोंडवली गावातील नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमात हरकुळ खुर्द हुलेवाडी येथील उमेश हुले, सुनील हुले, अश्विन हुले, ओंकार हुले, रावजी हुले, शुभम हुले, अमित कोलते, सुनील भिसे आदींनी बबन नारकर यांच्या नेतृत्वाखाली ठाकरे शिवसेना पक्षात प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत संदेश पारकर यांनी केले.

## गवळीची नागपूर खंडपीठात धाव

**मुंबई :** अरुण गवळीला रजा घेऊन तुरुंगाबाहेर यायचे होते. परंतु प्रशासनाने त्याचा अर्ज फेटाळून लावला आहे. डॉन अरुण गवळीने संचित रजा मिळाव्यात यासाठी नागपूर खंडपीठात धाव घेतली होती. परंतु विधानसभा निवडणुकांचे कारण देत उपमहानिरीक्षकांनी रजेसाठी केलेला अर्ज नाकारला आहे. रजेसाठी केलेला अर्ज नाकारल्याने अरुण गवळी याने वकिलांमार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये धाव घेतली आहे. नागपूर खंडपीठाकडून पूर्व विभागाचे कारागृह उपमहानिरीक्षक आणि नागपूर मध्यवर्ती कारागृह अधीक्षक यांना नोटीस बजावत बजावण्यात आलेली आहे. या प्रकरणी २५ नोव्हेंबर पर्यंत उत्तर देण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत.

# निवडणुकीत पर्यावरणाचा विसर

## पर्यावरणवादी संस्थांकडून नाराजी; पक्ष, उमेदवारांचे दुर्लक्ष

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यात पर्यावरणाची समस्या गंभीर असून लुप्त होत चालेली खारफुटी, अनियमित पाऊस, पूरपरिस्थिती, वायू आणि सागरी प्रदूषण यांसारख्या समस्या राज्याला भेडसावत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेनुसार जागतिक पातळीवर दरडोई मोकळी जागा नऊ चौरस मीटर असताना नवी मुंबईत दरडोई मोकळी जागा ३.९ चौरस मीटर; तर मुंबईत केवळ १.१ चौरस मीटर दरडोई मोकळी जागा शिल्लक राहिली आहे.त्यामुळे मुंबई आणि आसपासच्या प्रदेशात उभी राहणारी काँक्रिट जंगले पर्यावरण ऱ्हासाचे एक गंभीर कारण असल्याचे नॅट कनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी नमूद केले आहे.

याकरिता लोकप्रतिनिधींनी या विषयाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तसे न केल्यास विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारांनी उमेदवारांना याबाबत जाब विचारण्याची गरज असल्याचे मत कुमार यांनी व्यक्त केले आहे.

विधानसभानिवडणुकप्रचाराच्या रणधुमाळीत राजकीय नेते आणि उमेदवारांकडून पर्यावरण विषयाकडे पूर्णपणे डोळेझाक करण्यात आल्याची खंत पर्यावरणवादी संस्थांकडून व्यक्त करण्यात आली आहे. जबाबदारी लोकप्रतिनिधींचीवाढत चाललेले अनियंत्रित बांधकाम, वाहनांची होणारी वाढ यामुळे शहरातील हवा प्रदूषित झाल्याने याचा परिणाम नागरिक आणि विशेषतः वृद्ध आणि लहान मुलांवर होत आहे. हे प्रदूषण नियंत्रणात रहावे यासाठी नागरिकांनी प्रयत्न करणे जसे गरजेचे आहे. तसेच, प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची मुख्य जबाबदारी लोकप्रतिनिधींचीदेखील असल्याचे मत वॉचडॉग फाऊंडेशनचे संचालक ॲड. गॉडफ्रे पिमेंटा यांनी व्यक्त केले. सरकारने सार्वजनिक वाहतुकीसाठी इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन द्यावे आणि वाहनांचे उत्सर्जन रोखण्यासाठी पर्यावरणपूरक पर्यायांना प्रोत्साहन द्यावे, असे पिमेंटा यांनी सुचवले आहे.

निर्देशांकात भारत शेवटीजैवविविधता निर्देशांकात भारताचा १८० देशांमध्ये १७६ वा क्रमांक लागत असल्याने संपूर्ण भारतासाठी पर्यावरणाचा मुद्दा अतिशय गंभीर बनला आहे. त्यामुळे पर्यावरण बचावासाठी वृक्षारोपण आणि संरक्षण मोहिमेवर सरकारने लक्ष केंद्रीत करावे, असे आवाहन पर्यावरणवादी संघटनांकडून करण्यात येत आहे.

सागर शक्तिसारखी संघटना उरण परिसरात समुद्राच्या आंतरभरती आणि ओहोटीसंदर्भात काम करत आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे उरणजवळील समुद्राचे पाणी दूषित झाल्याचा आरोप संघटनेचे संचालक नंदकुमार पवार यांनी केला आहे. पाण्याचा नैसर्गिक प्रवाहवळवल्यामुळेउरणपरिसरातील गावांना अवकाळी पुराचा फटका बसत असल्याचे पवारांनी सांगितले आहे. तसेच मुलुंडसारख्या भागात मिठागरांच्या जागेवर गृहनिर्माण केल्याने त्या भागात पुराचा धोका वाढल्याचे उदाहरण पवारांनी दिले आहे. तरीही यातून आपण काहीच धडा घेतला नसल्याची खंत पवारांनी व्यक्त केली आहे.

# चिन्ह नव्हे, उमेदवार पाहून सैनिकांचे मतदान

## ■ ईटीपीबीएस पोर्टलच्या मदतीने बजावतात हक्क

। सांगली । वृत्तसंस्था ।

नाव, फोटो अन् चिन्ह असं चित्र ईव्हीएमवर पाहून सामान्य लोक मतदानाचा हक्क बजावतात; तर लष्करातील जवान आणि अधिकारी ईपीबीद्वारे लोकशाहीच्या उत्सवात सहभाग घेतात. विशेष म्हणजे सैनिकांच्या मतपत्रिकेत उमेदवाराचे नाव, फोटो असतो, मात्र चिन्ह नसते. त्यामुळे सैनिकांना चिन्ह नव्हे तर उमेदवार पाहून मतदान करण्याची संधी मिळते.

लष्करातील सैनिकांसाठी ईटीपीबीएस पोर्टलद्वारे मतदान प्रक्रिया राबवली जाते. नामनिर्देशन पत्र भरण्याच्या अंतिम दिवसापर्यंत




पोर्टलवर नाव नोंदणी करण्यात आली. त्यानंतर लष्कराच्या रेकॉर्ड ऑफिसकडून विधानसभा मतदारसंघनिहाय असलेल्या ईआरओकडे मतदारांची यादी येते. अर्ज माघारीची मुदत संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी ईआरओकडून ही यादी अंतिम केली आहे. ईआरओकडून ईटीपीबीएस पोर्टलवर यादी टाकली जाते. त्यानंतर ७ अ प्रमाणे ई-पोस्टल बॅलेट तयार करण्यात येते. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ते रेकॉर्ड ऑफिसला पाठविले. सोबत १३-ए, बी, सी या लिफाफ्याचे नमुने तसेच स्वयंघोषणापत्र नमुना, मार्गदर्शक सूचनादेखील पाठविण्यात आल्या आहेत. ही सामग्री डाऊनलोड करण्यासाठी सात दिवसांची मुदत असते. म्हणजे ५ ते १२ नोव्हेंबरपर्यंत हे काम पूर्ण करावे लागणार आहे.

रेकॉर्ड ऑफिस आणि युनिट ऑफिस त्याच्या प्रिंट काढून संबंधित सैनिकांना मतपत्रिका देत आहेत. ई-पोस्टल बॅलेटवर उमेदवारांचे मराठी आणि इंग्रजी भाषेत नाव आणि फोटो असतो. त्यापुढे खूण करण्यासाठी रिक्त रकाना आहे. टिकमार्क केल्यानंतर १३ ए डिक्लेरेशन, १३ बी मतपत्रिका हे १३ सी या लिफाफ्यात बंद करण्यात येते. हा लिफाफा पोस्टाद्वारे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे पाठविला जात आहे.

मतमोजणीच्या दिवशी सकाळी आठ वाजेपर्यंतचे आलेले लिफाफे ग्राह्य धरले जाणार आहेत. कालावधी झाला कमीलोकसभा निवडणुकीवेळी संपूर्ण प्रक्रियेसाठी ४३ दिवस मिळाले होते. विधानसभेसाठी केवळ १९ दिवस आहेत. त्यामुळे यावेळी किती मतदान होते, हे पाहणे महत्त्वाचे आहे. २०१९ पूर्वी पोस्टल बॅलेट हे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना छापून लष्कराकडे पाठवावे लागत होते, ते परत पोस्टाने मिळायचे. यासाठी अधिक कालावधी लागत होता. त्यामुळे ही नवी पद्धत कमी वेळेत आणि सुरक्षित मतदानासाठी उपयुक्त असल्याचे मानले जात आहे.

## कणकवलीत मतदान जनजागृती फेरी

**कणकवली** :कणकवली नगरपंचायतीच्यावतीनेमतदानजनजागृती फेरी काढण्यात आली. नगरपंचायत कार्यालय येथून निघालेल्या या फेरीमध्ये मुख्याधिकारी गौरी पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते.नगरपंचायत कार्यालय ते पटकीदेवी मंदिर, तेथून बाजारपेठ मार्गे पटवर्धन चौक तेथून राष्ट्रीय महामार्गावरून कणकवली रेल्वे स्टेशन आणि तेथून पुन्हा नगरपंचायत अशी फेरी काढण्यात आली. मतदान जनजागृती अंतर्गत नगरपंचायतीच्यावतीने पथनाट्य, मतदार सेल्फी पॉइंट, मतदान हस्ताक्षर अभियान आदी उपक्रम राबविले जात असल्याची माहिती मुख्याधिकारी गौरी पाटील यांनी दिली.

# राज्यात आतापर्यंत ४९४ कोटींची संपत्ती जप्त

। मुंबई । प्रतिनिधी ।

मतदारांवर प्रभाव पाडणारी दारू, पैसे, अमली पदार्थ, मौल्यवान वस्तूंचा सुमारे ४९४ कोटींची संपत्ती आतापर्यंत जप्त करण्यात आली आहे. मंगळवारी मुंबईत दहिसर येथे दीड कोटींचे सोने जप्त करण्यात आले.

मतदारांना पैसे, दारू, मौल्यवान वस्तूंचे वाटप करण्याच्या घटना सातत्याने उघडकीस येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी तर मतदारांपर्यंत रसद पुरवण्यासाठी पोलिसांच्या गाड्यांचा वापर केला जात असल्याचा आरोप महायुतीवर केला होता. पवार यांचा आरोप आणि राज्यात उघडकीस येत असलेल्या घटनांची गंभीर दखल घेत निवडणूक आयोगाने कठोर कारवाईचे आदेश दिले होते. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी रुग्णवाहिका, पोलिसांच्या गाड्यांची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर विविध अंमलबजावणी यंत्रणांच्या कारवाया वाढल्या असून थेट प्रचार दौऱ्यावर असलेले शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे हेलिकॉप्टरही तपासण्यात आले.

# केसरकरांमुळे मल्टिस्पेशालिटी रखडले

## ■ राजन तेली : नेमळे येथील गावभेटीत आरोप

। सावंतवाडी । वृत्तसंस्था ।

येथील मतदारसंघाचे आमदार दीपक केसरकर यांच्या हट्टामुळे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलसारखा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागला नाही. मतदारसंघाचा विकास केला असा त्यांचा दावा असेल तर साड्या का वाटाव्या लागतात, असा सवाल महाविकास आघाडीचे उमेदवार राजन तेली यांनी आज येथे केला. सावंतवाडी तालुक्यातील नेमळे येथे गाव भेट दौरा आयोजित केला होता.

यावेळी सावंतवाडी विधानसभा मतदारसंघ प्रमुख रुपेश राऊळ, तालुकाप्रमुख मायकल डिसोझा, तातो राऊळ, विनोद काजरेकर, रमेश गावकर, सचिन मुळीक, संदीप पांढरे, प्रशांत बुगडे, सिताराम राऊळ, शामसुंदर मालवणकर, महेश मालवणकर, निळू गावडे, सुरेश राऊळ, भगवान पाटकर, महादेव घोगळे आदी उपस्थित होते.

तेली म्हणाले, सावंतवाडी मतदारसंघाचा केसरकरांनी विकास केला तर त्यांना साड्या वाटप, विविध आमिषे का दाखवावी लागतात? तुम्ही विकास केला तर जनता तुमच्या पाठीशी का नाही? या मतदारसंघात शिवसेनेच्या तिकीटावर दोनवेळा निवडून येऊन मतदारसंघातील मतदारांचा अपमान करून शिवसेनेची गद्दारी करणाऱ्या केसरकरांना जागा दाखविण्याची हीच वेळ आहे. त्यामुळे तुम्ही सर्वांनी मला या ठिकाणी एकदा जनतेची सेवा करण्याची संधी द्या. तुम्हाला अपेक्षित असा विकास नक्कीच करेन. आजची निवडणूक ही भविष्य घडविणारी आहे. त्यामुळे मतदारांनी जागरूकपणे ठाकरे शिवसेनेला मतदान करावे. आज या मतदारसंघात शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत आहे. त्यामुळे सर्वांनी मशाल या चिन्हासमोर बटन दाबून मतदान करावे. येत्या एक वर्षात माझ्या हातून या ठिकाणी महत्त्वाचे प्रश्न मार्गी लागताना दिसतील

# दिल्लीतील मोदींची सत्ता जाणार

## नाना पटोलेंचे भाकित

। मुंबई । प्रतिनिधी ।

विधानसभा निवडणुकीत भाजपाला पराभव दिसू लागला आहे. जातीधर्मात फूट पाडणाऱ्या महायुतीला सत्तेतून तडीपार करा. राज्यात महाविकास आघाडी जिंकली तर दिल्लीतील मोदींची सत्ताही जाईल, असा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे.



महाराष्ट्राला भाजपायुती सरकारने संकटात लोटले असून शिंदे, फडणवीस व अजित पवार यांनी दिल्लीत बसलेल्या मोदी, शाह यांना महाराष्ट्र लुटून देण्याचे पाप केले आहे. महाराष्ट्र गुजरातला गहाण ठेवला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यातही भाजपा महायुती सरकारने भ्रष्टाचार करून शिवाजी महाराज व कोट्यवधी शिवप्रेमींचा अपमान केला आहे. मनुवादी प्रवृत्तींना आता घरी बसवण्याची वेळ आली आहे, अशी टीका नाना पटोले यांनी केली.

# महाविकास आघाडीतर्फे ‘डोअर टू डोअर’ गाठीभेटी

। संगमेश्वर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील आरवली, कडवई, माखजन, कसबा आणि देवरूख शहरात गावभेट दौरा तसेच प्रचार फेरी आणि डोअर टू डोअर गाठीभेटी अशा पद्धतीने महाविकास आघाडीने नियोजन केल्यामुळे वातावरण ढवळून काढले आहे.विधानसभा निवडणूक आता काही दिवसांवर येऊन ठेपली असल्याने प्रचारात रंगत येऊ लागली आहे. चिपळूण मतदार संघात महाविकास आघाडी विरूद्ध महायुती अशी थेट लढत होत आहे.

महायुतीकडून शेखर निकम तर महाविकास आघाडीकडून प्रशांत यादव मैदानात उतरले आहेत. या मतदार संघात चिपळूण १५१ बूथ तर संगमेश्वर तालुक्यात १४९ बूथ आहेत. त्यामुळे दोन्ही तालुक्यातील मतदान काही प्रमाणात समसमान आहे. मतदानाच्या सरासरीत संगमेश्वर तालुका महत्वाची भूमिका बजावणार असल्यामुळे दोन्ही उमेदवारांचे लक्ष संगमेश्वर तालुक्याकडे लागले आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार प्रशांत यादव यांनी शनिवारी सकाळी आरवली बाजारपेठ येथून सुरवात केली.

व्यापारी तसेच नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्यानंतर माखजन बाजारपेठेतदेखील त्यांनी प्रचार फेरी काढत व्यापारी व मतदारांच्या भेटी घेतल्या आहेत. आरवली, माखजननंतर कडवई जिल्हा परिषद गटात महाविकास आघाडीकडून गावभेट कार्यक्रम राबवण्यात आला. सायंकाळी कसबा येथे गावभेट दौरा करत येथील कालभैरव मंदिराच्या समोरील सभागृहात बैठक घेण्यात आली.

# ‘महिलांना स्वावलंबी बनविणार’

। दोडामार्ग । वृत्तसंस्था ।

तालुक्यातील महिलांसाठी व्यावसायाभिमुख रोजगार निर्माण करण्यासाठी मी कार्यतत्पर आहे. या दुर्गम भागातील महिलांना चूल आणि मूल या व्यतिरिक्त स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी बारामती पॅटर्न दोडामार्ग तालुक्यात राबविण्याचा प्रयत्न आहे. माझ्यावर विश्वास ठेवून मला विजयी करा, मी महिलांच्या हाताला काम देऊन स्वावलंबी बनविण्यासाठी कटिबध्द आहे, अशी ग्वाही अपक्ष उमेदवार अर्चना घारे-परब यांनी दिली.

अर्चना घारे म्हणाल्या, तालुक्याची शैक्षणिक व्यवस्था पाहता शाळेच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थी जीव टांगणीला लावून शिक्षण घेत आहेत. ज्ञान मंदिरातच मुले सुरक्षित नाहीत, ही जोडामार्ग तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेची अवस्था आहे. ही अवस्था बदलणे गरजेचे आहे. तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेकडे केवळ सत्ताधाऱ्यांनी केलेल्या दुर्लक्षामुळे विद्यामंदिरे मोडकळीस आल्या आहेत. येथील शेतकऱ्यांचे मनोबल तुटले असून, शेतमाला हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी चिंतातुर बनला आहे. शेती वाचविताना शेतकऱ्यांच्या जीवावर बेतणारे प्रसंग भयावह आहेत. या विषयावर सत्ताधारी एकही शब्द बोलत नसून, उपायोजनांकडे दुर्लक्ष करीत आहेत, असे अपक्ष उमेदवार अर्चना घारे-परब म्हणाल्या.

## गोंदिया आणि तिरोडा मतदारसंघात उमेदवारांनी वेधले लक्ष

# दोन मतदारसंघात १४ मजूर रिंगणात

**गोंदिया : विधानसभा निवडणुकीसाठी गोंदिया आणि तिरोडा मतदारसंघातून एकूण ३६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यापैकी तब्बल १४ मजुरांनी आपला व्यवसाय हा शेती व मजुरी असल्याचे निवडणूक विभागाकडे सादर केलेल्या शपथपत्रात म्हटले आहे. एकीकडे निवडणूक लढविणे आता सोपे राहिले नाही असे म्हटले जात असतानाच शेती आणि मजुरी करणाऱ्या १४ उमेदवारांनी निवडणूक रिंगणात उडी घेतली असल्याने अनेकांचे लक्ष वेधून घेतले आहे.**

जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघासाठी निवडणुका होत आहेत. यामध्ये दोन विद्यमान आमदारांच्या वर्चस्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. दोघांच्या विरोधात दमदार उमेदवार असून गोंदियात माजी आमदार तर तिरोडात माजी आमदारांचे पुत्र लढाईत आहेत. हे चारही उमेदवार कोट्यधीश आहे. ते आपले राजकीय कसब वापरुन निवडणूक लढवित आहेत. यात शंकाच नाही; मात्र निवडणुकीत लोकांचा विश्वास महत्त्वाचा आहे या जोरावर एक-दोन नव्हे तर तब्बल १४ मजूर रिंगणात उतरले आहेत.

यामध्ये गोंदिया विधानसभा मतदारसंघातून एक तर तिरोडा विधानसभा मतदारसंघातून १३ मजूर रिंगणात आहेत. यांनी उमेदवारी अर्जासोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्रातून ही माहिती मिळाली आहे. हे आहेत रिंगणातील उमेदवार आपला व्यवसाय शेती व मजुरी दाखवून रिंगणात उतरलेल्या उमेदवारांमध्ये गोंदिया मतदारसंघातील राजेश डोये यांचा तर तिरोडा मतदारसंघातून चंपालाल साठवणे, दिनेश टेकाम, राजेंद्र सोयम, राजेश माधोराव आंबेडारे, अजय विश्वनाथ अंजनकर, खुशाल देवाजी कोसरकर, कैलाश बुधराम गजभिये, राजेश मयाराम तायवाडे, गणपत डुलीचंद रहांगडाले, निरज भूमेश्वर मिश्रा, निलेश प्रदीप रोडगे, राजेंद्र दामोदर बोंदरे व सोनू रमेश टेंभेकर यांचा समावेश आहे.































● अलिबाग-मुरूड आणि रोहा मतदार संघातील मविआ पुरस्कृत शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचारार्थ मतदार संघातील विविध ठिकाणी प्रचार करण्यात आला. यावेळी प्रत्येक विभाग निवडणूक चिन्ह असलेल्या शिट्टीच्या आवाजाने दुमदुमला होता.

# प्रीतम म्हात्रेंना साथ देणे आपले कर्तव्य

## सचिन ताडफळे यांचे प्रतिपादन

**। उरण । प्रतिनिधी ।**

उलवे नोडमधील रहिवाशांना पाणी, वीज आणि शाळा प्रवेश अशा अनेक समस्या भेडसावत आहेत. परंतु, गेल्या पाच वर्षात येथील रहिवाशांना विद्यमान आमदारांचे दर्शन देखील झालेले नाही. यामुळे येथील नागरीक हैराण झाले आहेत. जनतेच्या या समस्या दूर करण्यासाठी २४ तास जनतेसोबत असणारे युवा नेतृत्व प्रितम म्हात्रे यांनाच प्रचंड बहुमताने निवडून आणणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शेकाप नेते सचीन ताडफळे यांनी केले आहे. प्रीतम म्हात्रे यांच्या प्रचारानिमीत्ताने उलवे नोड येथे मतदारांच्या गाठीभेटी दौऱ्याचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना सचीन ताडफळे म्हणाले की, सरकारने लाडकी बहिण योजना आणली, मात्र ही लाडकी बहिण निरोगी व दिर्घायुषी होण्यासाठी काही केले नाही. ते महत्वाचे काम प्रीतम म्हात्रे करीत आहेत. स्त्रीयांची मोफत कर्करोग तपासणी तसेच प्रतिबंधक लस देऊन लाडक्या बहिणीला निरोगी राखण्याचे काम ते करत आहेत. तसेच, युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठी सक्षम करणारे मोफत प्रशिक्षण उपलब्ध करून देऊन युवकाचे भविष्य सुरक्षित करण्याचे काम ते करीत आहेत. यामुळे जनतेच्या हितासाठी सदैव कार्यरत असणाऱ्या या उद्याच्या सुर्याला साथ देण्याचे आपले कर्तव्य असल्याचे सचीन ताडफळे यांनी सांगितले.

यावेळी अखिलेश, शेकाप नेते जे.एम. म्हात्रे, नारायण घरत, जितेंद्र म्हात्रे आदींसह कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



### बहुजन व्यासपीठाचा पाठिंबा

**अगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीसाठी बहुजन व्यासपीठाच्यावतीने गजाननराव गवळी यांनी प्रीतम म्हात्रे यांना पाठिंबा जाहीर केलेला आहे. विधानसभेच्या निवडणुकीत ओबीसी, आदिवासी, भटके विमुक्त व मागासवर्गीय समाजाने निवडणुकीत प्रत्यक्ष मतदान करून शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांना प्रचंड मतांनी निवडून द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.**



# प्रीतम म्हात्रे यांचे पारडे जड

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण विधानसभा मतदार संघात करोडो रुपयांची कामे केल्याचा दावा करणारे आ. महेश बालदी आणि मा.आ. मनोहर भोईर हे फक्त विकासाच्या गप्पा करत असून, विकास कामे करण्यात दोघेही कमी पडल्याची भावना उरणकरांमध्ये निर्माण झाली आहे. परिणामी शेतकरी कामगार पक्षातर्फे निवडणूक रिंगणात उतरलेल्या प्रीतम म्हात्रे यांचे पारडे जड असल्याची चर्चा उरण मतदार संघात होत आहे. विधानसभा निवडणुकीत एकदा निवडून दिलेला उमेदवाराला उरणकर पुन्हा संधी देत नसल्याचा इतिहास आहे. भाजप महायुती तर्फे निवडणूक रिंगणात उतरलेले आ. बालदी यांची निवडणूक रिंगणात उतरण्याची ही दुसरी वेळ आहे. तर, शिवसेना ठाकरे गटाकडून मा.आ. भोईर यांना दुसऱ्यांदा संधी देण्यात आली आहे. तसेच, शेकाप तर्फे निवडणूक लढवत असलेले प्रीतम म्हात्रे पहिल्यांदाच विधानसभेची निवडणूक लढवत असून त्यांना एकदा संधी देऊन पाहण्याच्या विचारात उरण मधील मतदारांमध्ये निर्माण झाला आहे. यामुळे प्रीतम म्हात्रे यांच्या प्रचाराला स्थानिक उरणकर मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# खारेपाटातील पाणीप्रश्न मार्गी लावणार : अतुल म्हात्रे

**। गडब । वार्ताहर ।**

पेण विधानसभा मतदार संघातील शेकापचे उमेदवार अतुल म्हात्रे यांनी पेण तालुक्यातील खारेपाट वाशी विभागातल्या बहुतांशी गावांना भेटी दिल्या. येथील प्रत्येक गावात जाऊन त्यांनी विविध समस्या जाणून घेतल्या. या दरम्यान त्यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी बोलताना अतुल म्हात्रे म्हणाले की, गेले अनेक वर्ष भेडसावणाऱ्या पाण्याचा प्रश्न येथील प्रस्थापितांनी उद्यापही सोडवलेला नाही. मात्र, येथील जनतेला माझ्याकडून अपेक्षा आहे की हा प्रश्न कायमचा सोडवावा. आणि हा प्रश्न मुळापासून सोडवणार आहे. याचबरोबर या विभागातल्या युवकांना भेडसवणारा रोजगाराचा प्रश्नदेखील सोडवणार असल्याचे अतुल म्हात्रे यांनी सांगितले. तसेच, या विभागात वाड्या वस्त्या आहेत त्या गावांपासून लांब आहेत. येथील नागरीकांची शेतावर घरे आहेत. या ठिकाणी अजून देखील गाडी पोहोचत नाही. रस्ते देखील दुरावस्थेत आहेत. तसेच, पाण्याची देखील कुठली सुविधा नाही. या सम स्यांवर कायमचा तोडगा काढून येथील परीसर सुजलाम सुफलाम करणार आसल्याचे अतुल म्हात्रे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी पेण तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष अशोक मोकल, सामाजिक कार्यकर्ते रामशेठ घरत आणि शेकापचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# पनवेलमध्ये शिट्टीचा आवाज घुमणार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार बाळाराम पाटील यांच्या प्रचार फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. आम्ही ठरवलंय पनवेल विधानसभा मतदारसंघातून बाळाराम पाटील यांनाच प्रचंड बहुमतांनी विजयी करायचे आहे, अशा प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहेत.

खारघरमधील मॉर्निंग वॉक प्रचारादरम्यान बाळाराम पाटील यांनी अनेक मतदारांसोबत संवाद साधला. महाविकास आघाडीचे सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी या प्रचार फेरीमध्ये सहभागी झाले होते. गेल्या अनेक वर्षांपासूनचे बाळाराम पाटील यांचे सामाजिक आणि शहर ग्रामीण विकासाचे काम आम्ही पाहत आहोत. यामुळे त्यांच्यासारख्या विकासाची जाण असणारा आणि नागरिक तसेच कार्यकत्यांचा सन्मान राखणारा आमदारच आम्हाला हवा आहे, असे नागरिकांनी सांगितले.

प्रचारादरम्यान बाळाराम पाटील यांचे ठिकठिकाणी अतिशय उत्साहात स्वागत करण्यात आले. त्यांना विजयासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. जनसामान्यांनी जो सन्मान आणि विश्वास दर्शवला त्याच्या बळावर निश्चितच पनवेल विधानसभा मतदारसंघात शिट्टीचा आवाज घुमणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यावेळी नागरिकांनी अनेक सम स्या मांडल्या. या सोडवण्याचे आश्वासन बाळाराम पाटील यांनी दिले आहे.

# गरज तिथे नोकरी : प्रीतम म्हात्रे



**। उरण । प्रतिनिधी ।**

आमच्या भुमीपुत्रांची तरुण मुले शिकलेली आहेत. मात्र, त्यांच्याकडे आवश्यक प्रशिक्षण नसल्याने या तरूणांना पात्रता असूनही नोकरी मिळत नाही. यामुळे हा तरूण निराश झाला आहे. या तरूणांना योग्य प्रशिक्षण देऊन त्यांना नोकरी मिळविण्यासाठी सक्षम करण्याचे काम हाती घेतले आहे. येथील बेरोजगाराची समस्या दूर करण्यासाठी आता 'गरज तिथे नोकरी' हेच धोरण अवलंबण्याचा निर्धार आपण केला असल्याचे प्रतिपादन प्रितम म्हात्रे यांनी केले आहे. उरण विधानसभा निवडणुकीच्या निमीत्ताने शेकाप उमेदवार प्रतीम म्हात्रे यांनी दिघोडे येथे मतदारांच्या गाठभेठी घेऊन दौरा केला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी सरपंच किर्तीनिधी ठाकूर, बंडाशेठ, जितेंद्र म्हात्रे, महेश साळुंखे, शिवाजी काळे आदी उपस्थित होते.

# प्रीतम म्हात्रे यांच्या सभांचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण विधानसभेचे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी (दि.१५) दुपारी ४ वाजता मोटरसायकल प्रचार फेरी आणि सायंकाळी ६ वाजता उरण नगरपरिषदेच्या डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी प्राथमिक मराठी शाळेच्या मैदानावर जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी (दि.१६) उलवे नोड येथे दुपारी ४ वाजता मोटरसायकल प्रचार फेरी आणि सायंकाळी ६ वाजता उलवे नोड सेक्टर ५ येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (दि.१७) करंजाडे येथे दुपारी २ वाजता मोटरसायकल प्रचार फेरी आणि सायंकाळी ४ वाजता सेक्टर ४ येथे जाहीर सभा होणार आहे. याचदिवशी दुपारी ४ वाजता मोहोपाडा येथे मोटरसायकल प्रचार फेरी काढण्यात येणार आहे. तर, सायंकाळी ७ ते १० वाजता मोहीपाडा येथील अचानक क्रिकेट क्लबच्या मैदानावर जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी प्रमुख वक्ते मार्गदर्शन करणार आहेत.



# भाजप-सेनेच्या कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये प्रवेश

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर-माकडडोरा कातकरीवाडी येथील नागरिकांनी शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. तसेच, चिरनेर-केल्याचा माल आणि चांदायली कातकरीवाडी येथील भाजप-शिवसेना कार्यकर्त्यांनी देखील शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. वावेघर ग्रामपंचायतीचे भाजपचे माजी सदस्य रमेश माळी आणि वावेघर ग्रामपंचायतीच्या शिवसेनेच्या विद्यमान सदस्या शारु रमेश चव्हाण यांनी प्रीतम म्हात्रे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

# बोलणाऱ्यांची तोंडे..

बोलणाऱ्याचे तोंड धरता येत नाही असे म्हणतात. निवडणुकीच्या काळात तर हमखासच. मतदारही बहुदा त्याकडे एक मनोरंजन म्हणूनच पाहतात. पण त्यामुळे दिवसेंदिवस प्रचाराची पातळी खाली जात चालली आहे. यावेळीसत्तारुढांमध्ये तीन आणि विरोधात तीन असे सहा मुख्य पक्ष. शिवाय बाकीच्या आघाड्या इत्यादी. त्यामुळे सर्वत्रच बहुरंगी लढती झाल्या आहेत. फाटाफुटीही भयंकर. त्यातूनच कोणीही काहीही बोलावे असे चालले आहे. काही दिवसांपूर्वी अजितदादा म्हणाले की आर आर पाटील यांनी केसाने गळा कापला. आबा आता हयात नाहीत. पण सिंचन घोटाळ्याचे प्रकरण जिवंत झाले. गंमत अशी की, आबा हे काँग्रेसचे गृहमंत्री होते. त्यांच्या सहीने सिंचन घोटाळ्याची चौकशी लागली नव्हती. समजा फाईलवर त्यांनी सही केली असलीच तर ती मुख्यमंत्र्यांच्या सहीनेच पुढे गेली. हे मुख्यमंत्री होते देवेंद्रफडणवीस. ते आता दादांचेच सहकारी आहेत. देवेंद्रांनीआबांची सही दादांना दाखवली. पण स्वतःची बहुदा दाखवली नसावी किंवा दादांना ती दिसली नसावी. ते काही असो देवेंद्रांनी माझा गळा कापला असे म्हणण्याची हिंमत दादांमध्ये नाही. त्यावर एरवी वचावचाबोलणारेभाजपचे नेतेही गप्प आहेत. याच दादांनी शरद पवारांना निवृत्त होण्याचा सल्ला दिला होता. आता शरद पवार म्हणाले की मी राज्यसभेतून दीड वर्षांनी निवृत्त होईन. त्यानंतर बहुदा निवडणूक लढणार नाही. लगेच दादा धावत आले. लोकांना सांगू लागले की, आता काकांचा उत्तराधिकारी मीच. काकांनंतर तुम्हाला कोण पाहणार आहे असे ते थेट बोलतात. वास्तविक याच दादांना आपण पुन्हा पक्षात घेणार नाही असे काकांनी स्पष्ट केले आहे. याच दादांच्या विरोधात बारामतीतयुगेंद्र हा घरातला उमेदवार दिला आहे. दादा निवडून येतात की पडतात अशी अवस्था आहे. तरीही काकांचा वारसा बळकावण्याचा दादांचा उत्साह कमी होत नाही.

## राण्यांचा शिमगा

तिकडे सिंधुदुर्गात नारायण राणे उद्धव ठाकरे यांच्यावर चिखल फेकत आहेत. परवा म्हणाले की, मुख्यमंत्री होण्यासाठी उद्धव काँग्रेसच्या दारात गेले. बाळासाहेब असते तर उद्धव यांना गोळ्या घातल्या असत्या. आता गंमत अशी की, नारायण राणे सेना सोडून वीस वर्षांपूर्वी स्वतः पहिल्यांदा गेले ते काँग्रेसमध्येच. तिथे त्यांना मुख्यमंत्रीच व्हायचे होते. पण तिथे आधीच बऱ्याच इच्छुकांची रांग होती. मग २००८ नंतर अशोक चव्हाण यांना सोनियांनी मुख्यमंत्री केले तेव्हा यांनी पक्षातच उघड बंड केले. मला मुख्यमंत्री करण्याचा शब्द दिल्लीने दिला होता, अशोक चव्हाण मला ज्युनियर आहेत, मी त्यांच्यासोबत काम करणार नाही अशी मुक्ताफळे राण्यांनी उधळली. इतके करूनही काही जमले नाही तेव्हा ते निमूट बसले. तेव्हा राण्यांना काँग्रेसचे मुख्यमंत्री व्हायचे होते. त्यासाठी दिल्लीला आपण काय काय दिले हे ते अप्रत्यक्षपणे सांगत होते. आणि तेच राणे आता उद्धव यांना बाळासाहेबांनी गोळ्या घातल्या असत्या म्हणून सांगत आहेत. सध्याच्या काळात सर्वच पक्षांमध्ये गद्दारांची चलती आहे. तरीही गंमत म्हणजे हे सर्व एकमेकांना निष्ठेच्या शिकवण्या देत असतात. त्यावरून शिव्याही देत असतात.एकनाथ शिंदे हे बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेतात. पण ठाकरे यांनी उद्धव यांना आपले वारस केले होते. एकनाथ शिंदे यांना नव्हे. शिवाय, शिंदे आणि त्यांच्यासोबतच्या चाळीस लोकांनी अडीच वर्षे मजेत सत्ता भोगली. तेव्हा काही ते आम्हाला ही मंत्रिपदे नकोत वगैरे म्हणाले नाहीत. तिकडे सदा सरवणकर हे शिंदे गटाचे उमेदवार माहीममध्ये उभे आहेत. त्यांच्या विरोधात राज ठाकरे यांचे चिरंजीव आहेत. तिथे सदा सरवणकर यांनी बाळासाहेबांची शिवसेना सोडून गद्दारी केली असा प्रचार मनसेवाले करीत आहेत. पण खुद्द राज ठाकरे यांनी बाळासाहेबांच्याहयातीतच पक्ष सोडला त्याचे काय करणार याचे उत्तर देत नाहीत.

## नीच वृत्तीचे नेते

पंतप्रधान मोदी हे तर वाटेल ते बोलणाऱ्यांचे मुकुटमणीच आहेत. काँग्रेस ही दलित, आदिवासींचा द्वेष करते अशी टीका त्यांनी धुळे व अकोला इथल्या सभांमध्ये केली. पूर्वी काँग्रेसला दलित व आदिवासीएकगठ्टा मते देतात म्हणून भाजपचा तिच्यावर राग होता. लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेसने खोटे नॅरेटिव्ह पसरवून दलित, आदिवासी व मुस्लिम ंची मते मिळवली असा आरोप मोदींनी अनेकदा केला आहे. असे असताना तीच काँग्रेस दलित व आदिवासींचा द्वेष कसा करील हा साधा प्रश्न आहे. अर्थात तर्कसंगत बोलण्याची अपेक्षा मोदींकडून करणे हेच चुकीचे आहे. त्यांचीच री ओढत आता एकनाथ शिंदे हे ठाकरे यांची मशाल जातीवादाची आग लावण्यासाठी आहे अशी टीका करतात. या शिंदे यांना इथवर येण्याची संधी ज्या सेनेमुळे आणि उद्धव ठाकरे यांच्यामुळे मिळाली त्यांच्यावरच ते मोदींपेक्षाही अधिक तुटून पडतात. अर्थातच दिल्लीवाल्यांच्या आदेशानुसारच हे सर्व चालले आहे हे उघड आहे.एकीकडे मोदी आणि शाह हे काँग्रेसवाल्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप करतात आणि तेच पूर्वीचे काँग्रेसवाले त्यांच्या शेजारी व्यासपीठावर बसलेले असतात. परवा शाह यांनी बंद पडलेले साखर कारखाने ताब्यात घेण्यात बराच भ्रष्टाचार झाला असा आरोप कोल्हापुरात केला. पण हे ज्यांच्यावरचे हे आरोप गाजले त्या अजितदादांना प्रेमाने बोलावून यांनीच तर उपमुख्यमंत्री केले. हर्षवर्धन पाटील इतके दिवस यांच्यातच तर होते. थोडक्यात मोदी आणि शाहयांच्यासारख्या देशाच्या सर्वोच्च नेत्यांच्या बोलण्याला गल्लीतल्या कार्यकर्त्याच्या बरळण्याइतकीच किंमत उरलेली आहे. दुसरीकडे, शरद पवारांच्या कर्करोगामुळे आलेल्या व्यंगाचा उपहासाने उल्लेख करूनसदाभाऊ खोत यांच्यासारखे नेते खालच्या पातळीला जाऊन बोलत होते तेव्हा शेजारी व्यासपीठावर बसलेले देवेंद्रफडणवीस त्यांना दाद देत होते. हेच लोक एरवी संस्कृती, सभ्यता वगैरेंच्या गप्पा मारत असतात. एवढ्या तेवढ्याने यांचा अपमान होतो. असल्या नीच वृत्तीच्या लोकांना जनता आपले नेते मानणार काय हा या निवडणुकीतला खरा सवाल आहे.

विचार

# कोंडलेला श्वास

***अलिकडे दिवाळी साजरीकरण हा प्रदूषणाचा समानार्थी शब्द बनला आहे. लोक साक्षर झाले; परंतु सांस्कृतिकदृष्ट्या सजग झाले नाहीत. हल्ली दिवाळीत फटाक्याच्या वापरावर बंदी घालण्यात येते; परंतु या बंदीचा फारसा परिणाम होत नाही. दिवाळीप्रसंगी वाढणारे प्रदूषण कमी करण्याचे मार्ग शोधा आणि सण जबाबदारीने साजरा करा, हे आवाहन कागदावर राहते. हे वर्षही त्याला अपवाद ठरले नाही. त्यानिमित्ताने घेतलेला वेध.***



**राही भिडे**

दिवाळी किंवा दीपोत्सव हा भारतातील सर्वाधिक साजरा केला जाणारा सण आहे. दिव्यांचा सण म्हणून ओळखली जाणारी दिवाळी अंधारावर प्रकाशाच्या विजयाचे प्रतीक आहे. दिवाळी हा आनंद वाटण्याचा सण आहे; परंतु अलीकडच्या काळात आनंद वाटण्याऐवजी इतरांना दुःख देण्याची विकृती वाढत आहे. इतरांच्या जीवनातला अंधकार दूर करून प्रकाश पसरवण्याचे काम करण्याऐवजी आपला आनंद साजरा करताना इतरांच्या जीवनात अंधकार निर्माण केला जात आहे. अलीकडच्या वर्षांमध्ये, फटाक्यांच्या मोठ्या प्रमाणावरील वापरामुळे दिवाळी साजरीकरण हा प्रदूषणाचा समानार्थी शब्द बनला आहे. आपल्या देशात लोक साक्षर झाले; परंतु सांस्कृतिकदृष्ट्या सजग झाले नाहीत. संस्कृतीचा वेगळा अर्थ काढला जात आहे. दिवाळी जवळ येताच फटाक्याच्या वापरावर बंदी घालण्यात येते; परंतु या बंदीचा फारसा परिणाम होत नाही असे लक्षात आले आहे. दिवाळीच्या निमित्ताने प्रदूषणाच्या पातळीत होणारी वाढ कमी करण्याचे मार्ग शोधा आणि अधिक जबाबदारीने दिवाळी साजरा करा, हे आवाहन कागदावरच राहते. दिवाळीची परंपरा आणि महत्त्व मूळ हिंदू पौराणिक- आध्यात्मिक कथांमध्ये आहे. हा सण प्रभू रामाशी संबंधित आहे. रावणाचा केलेला वध आणि १४ वर्षांच्या वनवासानंतर अयोध्येत परतल्यानंतर, लोकांनी आनंद साजरा करण्यासाठी रामाच्या सन्मानार्थ दसऱ्याला तेलाचे दिवे लावले. कालांतराने हा सण देवी लक्ष्मीशीही जोडला गेला, जो धन आणि समृद्धीचे प्रतीक आहे.

दिवाळीच्या परंपरा वेगवेगळ्या प्रदेशात बदलतात; परंतु सामान्यतः दिवे आणि रांगोळीसह घरांची स्वच्छता आणि धार्मिक विधी यांचा समावेश होतो. मित्र आणि कुटुंबियांमध्ये मिठाई आणि भेटवस्तू वाटणे हा अलीकडच्या काळातील प्रघात आहे. दिवाळी ही भारतात रामाच्या कथेशी संबंधित आहे, तर दक्षिण भारतात ती कृष्ण आणि सत्यभामा यांच्या विजय कथेशी संबंधित आहे. नरकासुराचा वध करून श्रीकृष्ण सत्यभामेसोबत परतले, तेव्हा लोकांनी दिवे लावले होते, अशी कथा आहे. त्यामुळे उत्तर आणि दक्षिण भारतात दिवाळी एकमेकांच्या एक दिवस पुढे साजरी होते. अलीकडच्या काळात दिवाळी साजरी झाल्यानंतर प्रदूषणाच्या पातळीत वाढ झालेली दिसते. शहरी भागात, फटाके वाजवणे हा अनेकांच्या दिवाळी साजरीकरणाचा अविभाज्य भाग बनला आहे. फटाके पीएम २.५ या घटकांसह लक्षणीय प्रमाणात वायू प्रदूषक सोडतात. त्याचे प्रमाण पीएम १० पर्यंत जाते. त्यात कार्बन डायऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड आणि नायट्रोजन ऑक्साईड्स आणि इतर विषारी पदार्थांचा समावेश असतो. त्यामुळे दिल्ली, मुंबई आणि कोलकातासारख्या शहरांची वायूची गुणवत्ता कमी होते.

दिवाळीच्या काळात फटाक्यांचे अवशेष, प्लॅस्टिकचे रॅपर आणि इतर प्रकारचा प्रचंड कचरा रस्त्यावर पडलेला असतो. हा कचरा कुरूप तर दिसतोच; पण त्याची योग्य विल्हेवाट लावली जात नाही. फटाक्यांमध्ये कॅडमियम, शिसे आणि पारा आदी जड धातू असतात. ते जमिनीत मिसळतात आणि शेती तसेच भूजल गुणवत्तेला धोका निर्माण करतात. दैनंदिन जीवनात मानवाकडून होणारी पर्यावरणाची हानी सर्वांनाच माहीत आहे. जमिनी नापीक होत चालल्या आहेत, महानगरांची हवा आता श्वास घेण्यास योग्य राहिलेली नाही. भाजीपाला, फळांपासून दुधापर्यंत विषारी रसायने पोहोचली आहेत. हवामानावरील पॅरिस करारावर अद्याप राष्ट्रीय पातळीवर काम सुरू झालेले नाही. प्रत्येक ऋतूचे चक्र घसरत आहे. हे पाहता आपण कोणताही सण साजरा करताना पर्यावरणाचे भान आवर्जून राखले पाहिजे. पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्याच्या चिंतेमुळे अनेक राज्य सरकारांनी दिवाळीदरम्यान फटाक्यांच्या वापरावर मर्यादा घालण्यासाठी किंवा त्यावर बंदी घालण्यासाठी उपाय लागू केले होते. सर्वोच्च न्यायालयाने फटाके विक्री आणि फोडण्याबाबत निर्देश दिले होते. 'ग्रीन फटाके' वापरास प्रोत्साहन दिले गेले आहे. या नियमांची अंमलबजावणी करणे आव्हानात्मक आहे. कारण लोक पारंपारिक फटाके वापरतात. समाजप्रबोधनाशिवाय हा प्रश्न सुटणार नाही, कारण राजकारण किंवा प्रशासन नियम बनवून शिस्त आणू शकतात; पण समाजाने निर्धार केला, तरच त्याचा वापर रोखता येईल.

या दिवाळीमध्ये दिल्लीमध्ये फटाके फोडण्याच्या अनेक वर्षांच्या आकडेवारीला तडा गेला, कारण जनतेने फटाक्यांवर बंदी पूर्णपणे स्वीकारली नाही. दिवाळी वगळता इतर दिवसांप्रमाणेच हवाही विषारी आहे. त्यामुळे जनतेच्या मनाची तयारी करूनच हे काम होऊ शकते. लोकांना जागरूक करणे हाच त्यावरील उपाय आहे. याशिवाय पर्यावरण संस्था आणि माध्यमांनी चालवल्या जाणाऱ्या जनजागृती मोहिमांनीही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. होळी किंवा दिवाळीला वेळोवेळी अशा मोहिमा राबवून लोकांना पर्यावरणरक्षणाशी जोडले जाते; परंतु लोक या मोहिमेशी तेवढ्यापुरतेच जोडले जातात. दिवाळी हा लाखो लोकांच्या जीवनात प्रकाश, आनंद आणि आशा आणणारा सण आहे; तथापि त्याच्याशी संबंधित प्रदूषण हा एक महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. शहरी भारतात अशा प्रकारे योग्य मानसिकतेने दिवाळी साजरी करणे शक्य आहे. यामुळे पर्यावरणरक्षण आणि उत्सवाचे सांस्कृतिक महत्व राखणे हे दोन्ही उद्देश साध्य होतील. फटाके टाळून, पर्यावरणपूरक सजावट निवडून आणि शाश्वत पद्धतींवर लक्ष केंद्रित करून दिवाळी खऱ्या अर्थाने आनंददायी आणि प्रदूषणमुक्त साजरी करण्यात लोक आपली भूमिका बजावू शकतात. गेल्या काही वर्षांच्या तुलनेत या वेळी दिवाळीत बंदी असतानाही दिल्लीतील लोकांनी फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी केली.

एका अहवालानुसार, गेल्या वर्षीच्या तुलनेत दिवाळीमध्ये दिल्लीतील आवाजाच्या पातळीत वाढ झाली आहे. संध्याकाळी सहा ते मध्यरात्रीदरम्यान डेसिबलमध्ये मोजण्यात आलेल्या रीडिंगवरून दिसून आले की करोलबाग येथील आवाजाची पातळी सरासरी ८८.७ डेसिबल होती. २०२३ मध्ये आवाजाची पातळी ८४.५ डेसिबल होती. औद्योगिक भागातही मिश्र पातळी नोंदवली गेली. वजीरपूरमध्ये आवाजाच्या पातळीमध्ये तीन टक्के वाढ झाली तर नरेलामध्ये १.६ टक्क्यांनी घट झाली. प्रदूषणाचा सामना करण्यासाठी दिल्ली सरकारने सलग पाचव्या वर्षी फटाक्यांची निर्मिती, साठवणूक, विक्री आणि वापरावर बंदी घातली होती. तरीही दिल्लीमध्ये मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. फटाक्यांमुळे हवा प्रदूषित होते. दिल्ली-एनसीआरमध्ये सध्या हवेची गुणवत्ता खूपच खराब आहे आणि प्रदूषणामुळे श्वसनाच्या समस्या वाढत आहेत. आरोग्यतज्ज्ञ मॉर्निंग वॉक टाळण्याचा सल्ला देत आहेत. हवा प्रदूषित होते, तेव्हा श्वास घेणे कठीण होते. त्याच वेळी आधीच श्वसनाचा त्रास असणाऱ्यांनी स्वतःची विशेष काळजी घेतली पाहिजे. सकाळ-संध्याकाळ वायू प्रदूषणाचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. या काळात जास्तीत जास्त वेळ घरात राहण्याचा सल्ला दिला जातो.

श्वासोच्छवासाचे व्यायाम आणि प्राणायाम श्वसनसंस्था मजबूत करतात. मोकळ्या हवेत योगासने किंवा इतर कोणताही व्यायाम करू नये, असे आवाहन केले जाते. हवेतील प्रदूषणामुळे श्वसनाच्या समस्या वाढू शकतात. आहारात फळे, भाज्या आणि नट यासारख्या अँटी-ऑक्सिडंटने समृद्ध असलेल्या गोष्टींचा समावेश केल्यामुळे वायू प्रदूषणामुळे होणारा ऑक्सिडेटिव्ह ताण कमी होण्यास आणि श्वसनसंस्थेचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. अर्थात या वरवरच्या उपाययोजना झाल्या; परंतु एखादा आजार मुळापासून दूर करायचा असेल, तर त्यावर उपायही तेवढाच जालीम असायला लागतो. जादा प्रदूषण करणाऱ्या, जादा आवाज करणाऱ्या फटाक्यांच्या निर्मितीवर बंदी घातली, तरच ते फोडले जाणार नाहीत. सरकार नेमके तिथेच कच खाते. कायदेशीर कारवाई आणि प्रबोधन या दोन मार्गांनी एकाच वेळी प्रयत्न केले, तरच प्रदूषणाला आळा घालता येईल. शिवाय कोणत्याही गोष्टीवर बंदी घालायची म्हटले, की आमच्या सणाच्या वेळीच हे सुचते का, इतर धर्मियांच्या सणांप्रसंगी हे का सुचत नाही, असे प्रश्न उपस्थित होतात. मात्र हवा प्रदूषित झाली, की होणारा त्रास धर्म, जात, पंथ अशी विभागणी करत नाही. नुकत्याच सरलेल्या दिवाळीच्या निमित्ताने एवढा संदेश घेतला, तरी पुष्कळ झाले.

आजकाल

# तरुण पिढीचे मनोगत




**निलेश सा..रंग**

बहिणीसोबत कितीही वाद असले तरी भाऊबीजेच्या दिवशी आपण तिच्या घरी जाऊन तिच्याकडून आपली ओवाळणी करून घेतली. तिला चांगले आशिर्वाद दिले आणि भाऊबीज हा सण आनंदात साजरा केला. याचप्रमाणे आपली सर्वांची लाडकी बहीण तथा अलिबाग-मुरूड आणि रोहा या विधानसभा मतदार संघातील शेतकरी कामगार पक्षाच्या व महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांना येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान करून त्यांना आमदारकीची ओवाळणी द्यायची आहे.

चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांच्यामार्फत पिडीत जनतेची, महिलावर्गाची व आदिवासी जनतेच्या गरजा सरकारपर्यंत पोहचविण्यासाठी तसेच येणाऱ्या सरकारी योजना त्यांच्या दारापर्यंत पोहोचवून या योजनेचा लाभ कसा घेता येईल यासाठी आपली लाडकी बहिण चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांची शेतकरी कामगार पक्षाने अलिबाग-मुरुड आणि रोहा या मतदार संघातील अधिकृत उमेदवार म्हणून त्यांची निवड करण्यात आलेली आहे.

चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई या कोणाच्यातही भेदभाव न करणाऱ्या तसेच सर्वधर्म समभाव या विचाराने चालणाऱ्या आहेत. चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई या मूळ नाशिकच्या आहेत. परंतु, त्या विवाह करून अलिबाग येथे शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणिस जयंत पाटील यांच्या कुटुंबात सामील झाल्या. त्या विवाह पूर्वी पासूनच जनतेच्या सेवेसाठी, त्यांच्या हक्कासाठी लढा देत आल्या आहेत.

प्रत्येक व्यवहारात आपण बहिण-भाऊ असा भेदभाव करत असतो. प्रत्येक गोष्टीत भावाला प्राधान्य देत असतो. त्याप्रमाणे जनतेची, तरुण वर्गाची, महिला वर्गाची, आदिवासी वर्गाची सरकारी योजना त्यांच्या पर्यत पोहचतच नाही. तीच योजना सर्व जनतेपर्यंत कशी पोहोचेल याची धडपड घरोघरी दारोदारी जाऊन गावातील प्रमुख गाव पाटील, सरपंच, पोलीस पाटील, महिला मंडळ यांची प्रत्यक्ष घरी जाऊन भेट गेऊन त्यांच्या गावातील महिलांच्या कोणत्या अडचणी आहेत याची यादी करून त्या कशा प्रकारे आपल्याला पार पाडता येतील अशी धडपड त्यांची चालू असते. तसेच, आपल्या कुटुंबांमध्ये कुटुंब प्रमुख म्हणून आपण पुरुषाची निवड करतो. कारण तो बाहेरून कमाऊन आणतो. मात्र, ते चुकीचे आह. खरंतर कुटुंब प्रमुख ही आपली घरातील स्त्रीच असते. कारण तिच्यावर पूर्ण कुटुंबाची जबाबदारी असते आणि ती योग्य रीतीने ती पार पाडते.

जशी आपल्या घरातील स्त्री आपल्या कुटुंबाची पालन पोषणाची जबाबदारी स्वीकारते, त्याचप्रमाणे गावातील संपूर्ण घरे एकत्र करून एक गाव तयार होतो. तसेच, संपूर्ण गावे एकत्र करून एक तालुका तयार होतो. आणि अशातच अलिबाग, मुरुड, रोहा हे तीन तालुके एकत्र करून एक विधानसभा मतदार संघ तयार करण्यात आला आहे. आणि हा मतदारसंघ म्हणजे आपल्या हक्काचे घर. या घराचे संरक्षण करण्याकरिता सरकारी योजना जनतेपर्यंत पोहचावी तसेच आपल्या अलिबाग, मुरुड, रोहा मतदारसंघाचे रक्षण करण्याकरिता आपली लाडकी बहिण चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांना बुधवारी (दि.२०) आमदारकी निवडणुकीकरीता सर्व तरुण पिढी, महिला वर्ग, आदिवासी वर्ग या सर्वांनी मतदान करून आमदारकीची भाऊबीज द्यावी.

लोकसंसद

## कोणता झेंडा घेऊ हाती?

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला अवघा एक आठवडा उरला असताना सर्वच पक्षांच्या उमेदवारांच्या आणि अपक्ष उमेदवारांच्या प्रचारफेऱ्यांत वाढ झाली आहे. विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचता आले नाही तरी जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचून आपला प्रभाव पडावा हाच या प्रचारफेऱ्यांचा हेतू. पण त्यासाठी जमवावी लागणारी कार्यकर्त्यांची गर्दी मात्र हल्ली पैसे मोजल्याशिवाय जमा होत नाही हे वास्तव आहे. दिवसा ५०० ते ७५० रुपये आणि दुपारच्या जेवणाची सोय केल्यानंतरच कार्यकर्ते प्रचारफेरीत यायला तयार होतात किंवा तसे कार्यकर्ते पुरवले जातात अशा प्रकारच्या बातम्याही वाचनात येत असतात. या प्रचारफेऱ्यांत काही निष्ठावंत कार्यकर्ते असतीलही परंतु त्यांची संख्या कमी झाली आहे हे नाकारता येत नाही. याचाच परिणाम म्हणून की काय कधी कधी आपण कोणाच्या प्रचारफेरीत आहोत हे काहींना सांगता येत नाही. तसे व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारितही झालेले आहेत. एका पक्षाच्या प्रचारफेरीतील कार्यकर्ते दुसऱ्या पक्षाच्या प्रचारफेरीत आढळले तर त्यात नवल वाटण्याचे काही कारण नाही. त्यामुळेच की काय अशा कार्यकर्त्यांना 'कोणता झेंडा घेऊ हाती?' हा प्रश्नच गैरलागू ठरावा.

**-दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१३ नोव्हेंबर**

१८५५ :- नट, नाटककार आणि नाटयदिग्दर्शक गोविंद बल्लाळ देवल यांचा जन्म. काही काळ वृत्तपत्रातून लेखन केले. कालांतराने 'कादंबरी कलाप' हे मासिकही काढले तसेच 'लंडन रहस्य' हा भाषांतरीत ग्रंथ लिहिला. पण त्यांचा मूळ पिंड नाटककाराचा. 'मृच्छकटिक', 'झुंझारराव', 'शाप संभ्रम', 'संशयकल्लोळ', 'शारदा' मिळून ७ नाटके त्यांनी लिहिली. १८७३ :- लेखक, विधिज्ञ, वक्ते आणि पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरु बॅ. मुकुंद रामराव जयकर यांचा जन्म. 'स्टडीज इन वेदान्त' या संपादित पुस्तकांसह हिंदू धर्मासंबंधीचे विचार त्यांनी 'मराठीमंदिर' या नियतकालिकातून मांडले. याशिवाय स्वतःचे आत्मचरित्र त्यांनी लिहिले. १९१४ :- मुंबई, साष्टी, ठाणे परिसराच्या इतिहासाचे अभ्यासक अशोक सावे यांचे निधन. त्यांनी 'महिकावतीची बखर'चे पुर्नः संपादन केले होते. तसेच वृत्तपत्रे, आकाशवाणी साठी लेखन केले होते. याशिवाय कोकणच्या वाडवळी व तत्सम बोलीवरील पुस्तक आणि चिंचणी परिसर' ही पुस्तके त्यांची प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. १९१८ :- निबंधकार, भाषांतरकार काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांचे निधन. सरकारी शिक्षण खात्याच्या आदेशानुसार त्यांनी ज्योतिषशास्त्र, भूवर्णन, न्यायशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र ही पुस्तके इंग्रजीवरुन भाषांतरित केली. १९२३ : बुध्दीबळासारख्या किचकट खेळावर खुमासदार शैलीत लेखन करणारे लेखक नागनाथ राजन वडनप यांचा जन्म. 'बुध्दीबळे' हा ४१६ पानांचा त्यांचा ग्रंथ महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केला. याशिवाय 'बुध्दीबळातील पेचप्रसंग', 'बुध्दीबळाचा ओनामा', 'चढाईची चमक व कसब दाखविणारे वेचक डावपेच', 'बुध्दीबळ शिका', 'बुध्दीबळाचा श्रीगणेशा' या पुस्तकांसह दै. सकाळ आणि मराठी विश्वकोश भाग ११ मध्ये 'बुध्दीबळ खेळ नोंद' प्रसिध्द. १९२८ :- लेखक, विचारवंत, संपादक विश्वास रघुनाथ पाटील यांचा जन्म. 'नवी क्षितिजे' हे नियतकालिक त्यांनी सुरु केले. 'प्लेटो, फ्राईड' यासंबंधीचे त्यांचे लेखन त्यांच्या व्यासंगाची ग्वाही देते. तथापि त्यांचे पुष्कळसे लेखन अनुवादित आहे. १९३१ :- लेखिका सुमन शिवराम टिळक यांचा जन्म. 'तृषार्त' ह्या कादंबरीसह विविध नियतकालिकांतून कथा, कादंबऱ्या, लेख त्यांचे प्रकाशित झाले आहेत. १९३७ :- आकाशवाणीचे मान्यवर कवी, वक्ते अरविंद गोपाळ देशपांडे यांचा जन्म. 'सूरपक्षी' ह्या काव्यसंग्रहासह 'इंद्रायणीचे तरंग', 'महाराष्ट्राचा आदित्य' आदी पुस्तके प्रसिध्द १९४९ :- लेखक आणि 'रानवारा' या मुलांच्या पाक्षिकचे संपादक, प्रकाशक प्रा. विलास चाफ`कर यांचा जन्म. ह्याच्या 'रचनात्मक कार्याची दिशा' या ग्रंथातून महाराष्ट्रातील सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था, व्यक्ति, त्यांचे कार्य यांचा परिचय करुन दिला आहे. १९४२ : - कृषीविषयक लेखक गणेश केशव केळकर यांचे निधन. 'ज्ञानकोशाचा शेतकी विभागाचे ते संपादक. 'जमीन मशागत व शेतकीचे आडते' या ग्रंथासह शेतीसंबंधी ८ ते ९ पुस्तके प्रकाशित. गायकवाड यांचा जन्म, ' शूद्र' मधून त्यांनी बुध्दकालीन शुद्राचा कादंबराद्वार विचार माडलाय. २००१ :- लेखिका सरोजिनी मधुसूदन शारंगपाणी यांचे निधन. दुर्देवाशी दोन हात' या त्यांच्या आत्मचरित्राला राज्य शासनाचा पुरस्कार. २०१४ :- गेली तीन दशके आपल्या लेखणीसह समालोचनाने मराठी क्रीडा पत्रकारितेत आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवणारे आणि क्रिकेटसह देशी खेळांच्या प्रचार आणि प्रसारासाठी सदैव झटणारे ज्येष्ठ क्रीडा पत्रकार व समीक्षक चंद्रशेखर प्रभाकर संत यांचे निधन. स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रिकेटवर त्यांनी विपूल प्रमाणात लेखन केले.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ नोव्हेंबर

१) श्रीम. सुहासिनी रमेश मांजरेकर
कुरुळ, कॉलनी, अलिबाग
१३-११-१९४२

२) श्रीम. भारती मधुकर म्हात्रे,
बामणोली, पो.थळ, अलिबाग
१३-११-१९५०

३) श्री. जगदीश दत्तात्रेय घरत
वरसोली, अलिबाग १३-११-१९५३

४) श्री. विजयकुमार काशिनाथ पाटील
नागडोंगरी, अलिबाग १३-११-१९५३

५) श्री. तुळशीदास हाशा वरसोलकर
मेटपाडा, कोळीवाडा, अलिबाग
१३-११-१९५२

६) श्रीम. चंद्रकला चंद्रकांत देवरुखकर
गोंधळपाडा, वेश्वी, अलिबाग
१३-११-१९३९

# वाहनचालकांचा प्रवास खडतर

## कर्जत-खोपोली राज्यमार्गाची दुरवस्था; स्थानिक शेतकरी मोबदल्याच्या प्रतीक्षेत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत ते खोपोली व्हाया पळसदरी मार्गावर वर्णे येथे वाहन चालवताना अतिशय खडतर प्रवास करावा लागत आहे. मोठ मोठे खड्डे असलेला हा रस्ता एमएसआरडीसी अंतर्गत तीन वर्षांपूर्वी पूर्ण झाला असला तरी ठराविक ठिकाणी शेतकऱ्यांना मोबदला न मिळाल्याने त्या ठिकाणचा रस्ता झालेला नाही. २०११ साली एमएमआरडीएमार्फत भूसंपादन करताना शेतकऱ्यांना मोबदला देण्याची मागणी शेतकरी करीत आहेत. तर रस्त्याचे अर्धवट काम पूर्ण करण्याची मागणी वाहनचालक करीत असून, राज्य रस्ते विकास महामंडळ या दोन्ही मागण्या कधी पूर्ण करणार असा प्रश्न पडला आहे.

एमएसआरडीसी माध्यमातून शहापूर-मुरबाड-कर्जत-हाल असा काँक्रिटीकरणयुक्त राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८/अ गेल्या तीन वर्षे आधीच काही त्रुटी वगळता पूर्ण झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण तयार झाले होते. अपवाद म्हणजे, पळसदरी मार्गातील वर्णे, पळसदरी, तलवली, हाल, नावंढे या ठिकाणी शेतकऱ्यांना जागेचा मोबदला न मिळाल्याने सदर ठिकाणचा रस्ता करण्यास संबंधित ठेकेदार असमर्थ ठरले. त्या ठिकाणचे काम अर्धवट ठेवून ठेकेदाराने पसारा आटोपला. मात्र, सध्या



वर्णे या ठिकाणी खूप मोठे खड्डे असून, तासी ८० च्या गतीने आलेल्या गाड्या कोणतेही दिशादर्शक फलक नसल्याने खड्ड्यात आपटतात, त्यामुळे अनेक अपघात या ठिकाणी होत आहेत. शेतकऱ्यांना मोबदला मिळाला नसल्याने त्यांनी रस्त्याचा एक भाग डांबरीकरण, काँक्रिटीकरण करून देण्यास विरोध केला आहे.

तब्बल १२ गावांतील २५६ शेतकरी बाधित असून, अनेक शेतकऱ्यांना मोबदला देण्यात आलेला नाही. गेली अनेक वर्षे राष्ट्रीय महामार्ग असलेल्या या महामार्गावर त्यांना खड्ड्यांतून प्रवास करावा लागत आहे. खोपोली ते कर्जत असा रोजचा प्रवास वाहनाने करणारे नागरिक भयंकर त्रस्त झाले असून, ही समस्या लवकर सोडवावी, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. मात्र, रस्त्याचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी आणि वाहनचालक यांच्या अडचणी दूर करण्यासाठी राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून कोणत्याही प्रकारच्या हालचाली केल्या जात नाहीत. त्यामुळे एकाच वेळी शेतकरी मोबदला नाही म्हणून आपला लढा कायम ठेवून आहेत, तर वाहनचालक हे या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे संतप्त आहेत.

# कर्जत तालुक्यात थंडीची चाहूल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नोव्हेंबर महिना सुरु झाल्याने वातावरणात गारवा पसरतो. त्यानुसार रात्रीच्या वेळी वातावरणात गारवा जाणवत होते. मात्र, दिवसा ऑक्टोबर हिटसारखी परिस्थिती निर्माण झाली. मात्र, सकाळच्या वेळी पसरलेले धुके हे मॉर्निंग वॉकसाठी निघणारे यांच्यासाठी आल्हाददायक वातावरण थंडीची चाहूल असल्याचे दिसून येत आहे.

थंडीची चाहूल लागल्याने माथेरानसारख्या थंड हवेच्या ठिकाणी गुलाबी थंडीचा आस्वाद घेण्यासाठी पर्यटकांचे लोंढे माथेरान कडे येऊ लागले आहेत. माथेरानमध्ये सध्या पर्यटकांचे लोंढे आल्याने पर्यटन व्यवसायासाठी थंडी सुगीचे दिवस आणू शकते. असे वातावरणात माथेरान शहरात पर्यटकांच्या गर्दीमुळे दिसून येत आहे. माथेरान शहरात



पर्यटक तेथील गुलाबी म्हणजे अंगाला बोचरी वाटणाऱ्या थंडीचा आस्वाद घेण्यासाठी येऊ लागले असल्याने सर्वत्र थन्डी येऊ घातली असल्याचे चित्र सकाळच्या धुक्याच्या दुलईमुळे निर्माण झाले आहे. वातावरणात रात्री अकरानंतर निर्माण होणार गारवा सकाळपर्यंत असल्याने थंडीची चाहूल म्हटली जात आहे.


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


# सह्याद्री प्रतिष्ठानकडून गडकिल्ल्यांची स्वच्छता



**। अलिबाग । वार्ताहर ।**

सह्याद्री प्रतिष्ठान ही संस्था महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांवर दुर्गसंवर्धन कार्य गेल्या चौदा वर्षांपासून अविरत करत आहे. गडकिल्ल्यांच्या डागडुजीसाठी महाराष्ट्रभर दुर्गसंवर्धन चळवळ ही संस्थेचे संस्थापक श्रमिक गोजमगुंडे यांच्या मार्गदर्शनाने होत आहेत. संस्थेने आजवर १००० हून अधिक दुर्ग संवर्धन मोहिमा, तर २००० पेक्षा जास्त दुर्ग दर्शन मोहिमा राबविल्या आहेत. रविवार, दि.१० नोव्हेंबर रोजी किल्ले रेवदंडा येथे सह्याद्री प्रतिष्ठान अलिबाग विभागाच्या मावळ्यांची पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबविली. या स्वच्छता मोहिमेत २५ ते ३० दुर्गसेवकांनी सहभाग नोंदविला. पुढेही अशाच स्वच्छता मोहिमा घेऊन साफसफाई करण्याचे ठरविले आहे, ज्यामुळे किल्ला पर्यटकांसाठी नक्कीच पर्वणी ठरेल, असे सह्याद्री प्रतिष्ठान अलिबाग विभागाचे मोहीम प्रमुख आकाश चिमणे यांनी सांगितले. यावेळी अध्यक्ष जितेंद्र म्हात्रे, उपाध्यक्ष सन्मेश नाईक, रक्षित पाटील, तेजस वर्तक, मनोज पारकर, हृषीकेश शिंदे, प्रथमेश धसाडे आदी उपस्थित होते.

# दिवाळी हंगाम संपला, पर्यटक परतीच्या प्रवासाला

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान पर्यटनस्थळ हे दिवाळी पर्यटन हंगामात पर्यटकांनी फुलून गेले होते. मागील दहा ते बारा दिवस याठिकाणी पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झालेली दिसत होती. आता दिवाळी सुट्ट्या या संपल्या असून, आपल्या कुटुंबासोबत धमाल, मौजमस्ती केल्यानंतर पर्यटकांचा ओघ हळूहळू परतीच्या वाटेकडे लागल्याचे चित्र दिसत आहे.

माथेरानमधील पावसाळी पर्यटन हंगामाप्रमाणे हा दिवाळी हंगाम जोरदार झाला. हजारोंच्या संख्येने येथे पर्यटक दाखल झाले होते. जिकडे पाहावे तिकडे पर्यटक नजरेस पडत होते. प्रेक्षणीय स्थळांवर पर्यटकांची गर्दी दिसत होती. शारलोट तलाव, एको पॉईंट, लुईझा पॉईंट, सनसेट म्हणून ओळखला जाणारा पार्क क्यू पाईन पॉइंट, मंकी पॉईंट, हार्ट पॉईंट या स्थळांवर पर्यटक धमाल, मस्ती करताना दिसत होते. येथील ऑलिम्पिया रेसकोर्सवर घोडेस्वारी करणारे पर्यटक दिसत होते. मात्र,



आता दिवाळी सुट्ट्या संपल्या असून, पर्यटक परतीच्या मार्गावर आहेत. त्यामुळे सर्व प्रेक्षणीय स्थळे सुन्न झालेली दिसत आहेत. .

माथेरान शहरात भटकंती करताना घोडा आणि हात रिक्षाचा वापर पर्यटक करीत होते. परतीच्या प्रवासाला जाताना पर्यावरण पूरक ई-रिक्षा आणि मिनीट्रेनला पसंती दिली.सकाळपासून रात्रीपर्यंत ई-रिक्षा धावत होत्या. पर्यटकांची रांग वाढत असतानादेखील ई-रिक्षा चालकांनी पर्यटकांना सेवा देऊन त्यांच्या परतीचा प्रवास सुखकर केला. मिनीट्रेनच्या तिकिटासाठी दोन-दोन तास उभे राहून तिकीट मिळवण्यात काही पर्यटकांना यश आले. पर्यटक संख्या जास्त आणि तिकीट संख्या कमी असल्याने काही पर्यटकांचा हिरमोड झाला.

> **माथेरान पर्यटनस्थळाची भुरळ अनेकांना पडलेली आहे. काही वर्षांपासून आम्ही दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये माथेरानला येत आहोत. यंदाही तीन दिवसांसाठी येथे मुक्कामी होतो. बच्चे कंपनींनी खूप धमाल मस्ती केली. नेरळ-माथेरान मिनिट्रेन प्रवासाचा आनंद पण घेतला.**
> **- अमोल महादे, पर्यटक, मुंबई**

> **यंदाचा दिवाळी हंगाम चांगलाच होता.शाळांना सुट्ट्या असल्याने मुंबई, पुण्यासह गुजरात आणि अन्य राज्यातील पर्यटकसुद्धा माथेरान पर्यटनस्थळी दाखल झाले होते. हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये पर्यटकांना चांगली सेवा दिली गेली. शाळा सुरू झाल्यामुळे पर्यटक परतीच्या प्रवासाला लागले आहेत. मात्र, अजूनही थोड्याफार प्रमाणात पर्यटक माथेरानमध्ये असून, मौजमजा करीत असताना दिसून आले. नगरपालिकेकडून सर्व सुविधा उपलब्ध होत्या. घोडा, हातरिक्षा, हॉटेल, लॉजिंग, रेस्टॉरंट, ई-रिक्षा, कुली, हॉकर्स या सर्वांना रोजगार मिळाला.**
> **- दीपक जाधव, माजी नगरसेवक**

# लक्ष्मण धुमाळ यांचे निधन

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील घोसाळे-विरजोली विभागातील महसूल विभागातीचे माजी कोतवाल व विरजोली गावचे रहिवासी असणारे लक्ष्मण महादेव धुमाळ यांचे मंगळवारी (दि. ५) निधन झाले. निधनसमयी ते ८७ वर्षांचे होते.



लक्ष्मण धुमाळ यांनी महसूल विभागात कोतवालाची नोकरी अगदी प्रामाणिकपणे करून आपला शेती व्यवसायदेखील व्यवस्थित सांभाळला.त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी गुरूवार, दि.१४ नोव्हेंबर रोजी, तर अंतिम धार्मिकविधी रविवार, दि.१७ नोव्हेंबर रोजी राहत्या घरी होणार आहेत.

# पत्रकार सत्यप्रसाद आढाव यांना मातृशोक



**। अलिबाग । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील न्हावे येथील रहिवासी पत्रकार सत्यप्रसाद महादेव आढाव यांच्या मातोश्री सुलोचना आढाव यांचे मंगळवारी (दि. १२) सकाळी आठच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. निधनसमयी त्या ८८ वर्षांच्या होत्या. मागील महिनाभरापासून त्या आजारी होत्या. सुलोचना आढाव यांच्या यांच्या पश्चात तीन मुली, एक मुलगा, सून, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाची बातमी समजताच न्हावे गावचे सरपंच, उपसरपंच, पत्रकार बांधव, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मंडळी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. कै. सुलोचना आडाव यांचे दशक्रिया विधी गुरुवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी, तर उत्तरकार्य रविवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी होणार आहेत.

# ढाक डोंगरावरुन आणला गरुडध्वज

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

देऊळवाडी किरवली येथील कार्तिक पौर्णिमेच्या उत्सवासाठी परंपरेनुसार डोलकाठीच्या टोकाला बांधण्यासाठी ढाक डोंगरावरील चढण्या-उतरण्यास अत्यंत कठीण असलेल्या भैरी मंदिरातून गरुड ध्वज आणला. यावेळी ढाक डोंगरावर गेलेल्यांमध्ये युवकांचा सहभाग होता.

सकाळी गरुड ध्वजाची पूजा सावळाराम बडेकर आणि हनुमंत गायकर यांच्या हस्ते देऊळवाडी येथील मंदिरात करण्यात आली. त्यानंतर श्री ग्रामदेवी बहिरी तळई संस्थान, देऊळवाडी किरवलीचे सचिव दिलीप बडेकर, पोलीस पाटील विवेक बडेकर,



सावळाराम बेडकर, ज्ञानेश्वर जाधव, नरेंद्र शेलार, अनिल खंडागळे, नयन बडेकर, सुनील गायकवाड, सुनील अहिर, राज बेडकर, निखिल पन्हाळे, राजेश बडेकर, संकेत बडेकर, योगी बडेकर, सोहम बडेकर, सिरेंद्र रसाळ, सौरभ बडेकर, नितीन बडेकर, प्रकाश बडेकर, प्रशांत बडेकर, शामा बडेकर, राहुल बेडकर, पंकज गायकवाड, रोहिदास पाटील, सतीश ठोंबरे, मयूर ठाणगे, संजय काळभोर, जनार्दन बेडकर आदी ग्रामस्थ गरुडध्वज आणण्यासाठी डोंगरावर गेले होते.

तो गरुडध्वज ढाक भैरी मंदिरात आणल्या नंतर गरुड ध्वजाची पूजा मनोहर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली दिलीप बडेकर यांच्या हस्ते करून अभिषेक करण्यात आला त्यानंतर हे सारे भाविक भक्त मार्गस्थ झाले. हा गरुड ध्वज देऊळ वाडी येथे आणण्यात आला. त्यावेळी प्रकशबुवा बडेकर आणि प्रभाकर राऊत यांनी पूजा केली. हा ध्वज गुरुवारी (दि. १४) डोलकाठीच्या तुऱ्यावर बांधण्यात येणार आहे. त्यानंतर शुक्रवारी (दि. १५) सकाळी डोलकाठी मंदिराजवळ उभी करण्यात येणार आहे.

**पान १ वरून**

## विमानतळ, अटल सेतू प्रकल्पग्रस्तांच्या त्यागाचे फलित

उरणच्या पवित्र भूमीमध्ये दिवंगत दि.बा. पाटील आणि शेकापचे नेते जनार्दन भगत यांचे रक्त सांडले आहे. या दोघांच्या विचारांचे नेतृत्व करणाऱ्या उमेदवाराला उरणची जनता मतदान करेल. कोणी बाहेरून आलेल्या थापाड्याला मतदान करणार नाही, असा विश्वासही म्हात्रे यांनी व्यक्त केला.

## थोरवेंच्या जाहीरनाम्याची घारेंकडून पोलखोल

सुधाकर घारे यांनी पत्रकार परिषद घेऊन कर्जत आणि खालापूर तालुक्यातील विकासकामांच्या प्रश्नावर माहिती दिली. विद्यमान आमदारांनी मतदारसंघात मोठे विकासकामे केली आहेत आणि त्यात अनेक मोठ्या कामांची नावे घेतली होती. याची पोलखोल करताना राज्याचे मुख्यमंत्री यांच्यासमोर भाषण करताना आमदार थोरवे यांनी ८०० कोटींचा निधी आणला. त्यानंतर मागील काही दिवस आधी जिल्हा प्रमुख संतोष भोईर यांनी दोन हजार कोटींचा उल्लेख केला. प्रशासकीय इमारत निधी, श्रीराम पूल ही कामे २०१९ मध्ये नोव्हेंबरमध्ये आमदार नसताना ती कामे मंजूर झाली होती. कोंढाणे धरणाचे काम २०१७ रोजी मंजूर झाले आहे, भूसंपादनदेखील त्यावेळी झाले होते. मात्र, त्यांच्या अहवालात १४०० कोटी मंजूर झाले आहे, तर त्यांचे काही योगदान नाही. असे असताना आ. थोरवे यांनी २९०० कोटींचा निधी आणला आहे असे जाहीर केले आहे. हा निधी आणला असेल तर तो निधी गेला कुठे, हे शोधावे लागले असे आवाहन सुधाकर घारे यांनी केले.

त्यांनी आणलेला तो निधी त्यांच्या घरी गेला की त्यांच्या घराच्या सुशोभिकरणासाठी गेला हेदेखील शोधावे लागणार, असा निर्धार सुधाकर घारे यांनी व्यक्त केला. २०१९ मध्ये दिलेल्या जाहीरनाम्यामध्ये जाहीर केलेली कामे कुठेही झाली नाहीत, असा आरोप सुधाकर घारे यांनी केला.

कर्जत येथे झालेल्या पत्रकार परिषदेत परिवर्तन विकास आघाडीचे उमेदवार सुधाकर घारे यांच्यासह भरत भगत, अशोक भोपतराव, भगवान भोईर, अंकित साखरे, मनसे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील, शेकाप जिल्हा सहचिटणीस विलास थोरवे, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष उत्तम जाधव, मनसेचे जिल्हा नेते प्रवीण गांगल, तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## सुरेश लाडांना बँकेची नोटी

झाली असून, हे पैसे थकबाकी असल्याने त्यांना बँकेमार्फत सहाय्यक निबंध कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १०१ प्रमाणे वसुलीची नोटीस काढण्यात आली आहे. दरम्यान, माझे कर्ज थकीत असल्याने मला नोटीस आली आहे हे मान्य आहे. मात्र, बँकेला आणि सहाय्यक निबंध कार्यालयाला माझ्याकडे पैसे आल्यावर मी कर्जाची रक्कम भरेन असे कळविले असल्याचे सुरेश लाड यांनी सांगितले.

## घोटवडेजवळ टेम्पोचा अपघात

भेरसेकडे जात होता. घोटवडेजवळ आल्यावर सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या महावितरण कंपनीच्या विद्यूत खांबाला टेम्पोची जोरदार धडक लागली. या धडकेत चालकासह टेम्पोतील कामगारांनादेखील दुखापत झाली. जखमींना तात्काळ अलिबागमधील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आल्याची माहिती रेवदंडा पोलिसांनी दिली. वडापाव खात तो वाहन चालवित असताना ही घटना घडल्याची माहिती समोर येत आहे.

**सुदैवाने मोठी जीवितहानी टळली**

महाजने दिवीवाडीवरून भेरसे येथे निघालेला टेम्पो रस्त्याच्या बाजूला असलेल्या विद्यूत खांबाला धडकला. उच्च दाब वाहिनीच्या विद्युत खांबाला धडकल्यानंतर खांब वाकला. विद्युत सेवा अचानक खंडित झाली. त्यामुळे सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असल्याचे महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

## ट्रकच्या धडकेत टोलवसुली कर्मचारी ठार

असताना फुडलॅण्ड कंपनीसमोरील उड्डाणपुलावरुन आलेल्या ट्रकने संदीपला धडक दिली. या धडकेमध्ये संदीप दोन्ही ट्रकच्या मधोमध चिरडून घटनास्थळीच तो ठार झाला. टोलच्या इतर कर्मचाऱ्यांनी संदीपला महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्माधिकारी ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी संदीपला मृत घोषित केले. या घटनेनंतर ट्रकचालक फरार झाला होता. ट्रकचालक बिलाल अहमद हजरत अली याला पोलीसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी बिलाल अली याच्याविरोधात गुन्हा नोंदविला आहे.

## उसरोलीत शिंदे गटाला भगदाड

शेकापच्या कार्यकर्त्यांनी सांगितले.

यावेळी शेकाप अलिबाग तालुका पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष विक्रांत वार्डे, शरद कुमरोठकर, गणेश ठोंबरे, उदय थळे, महेश पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व नवनिर्वाचित कार्यकर्ते उपस्थित होते.

## मतांसाठी आमदारांचा खोटारडेपणा

आता जनतेच्या निदर्शनास आली आहे. केवळ मतांचा जोगावा आपल्या झोळीत पाडून घेण्यासाठी तुम्ही खोटे बोलला आहात. तुम्हाचा खोटारडेपणा येथील जनता उघडा पाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांनी आ. दळवींना दिला आहे.

चणेरा भागात सोमवारी (दि.११) रोजी महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांनी कॉर्नर सभा घेत नागरिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आ. महेंद्र दळवी यांची पोलखोल करत जोरदार हल्ला केला. यावेळी व्यासपीठावर आरडीसी बँकेचे संचालक गणेश मढवी, अनिल साळावकर, गोपीनाथ गंभे, संदेश विचारे, मनोज भायतांडेल, अनिल माळी, शरद गंभे, हेमंत ठाकूर, अशोक कांबळे, अनिल वर्तक, राजेंद्र मळेकर, सरपंच गणेश भगत, राजेंद्र जंगम आदी मान्यवरांसह असंख्य नागरिक उपस्थित होते.

चित्रलेखा पाटील पुढे म्हणाल्या की, चणेरा भागात कारखाने आणू, या भागात आरसीएफ आणू, काही ठिकाणी सूटबूट आणि टाय लावलेल्या व्यक्तींना पाठवून ते आरसीएफ कंपनीचे अधिकारी आहेत असे भासवून तरुणांना नोकरीची हमी दिली. तरुणांच्या हाताला रोजगार देऊ असं सांगत त्यांच्याकडून बायोडाटा गोळा केलेत. आपल्या भागात कारखानदारी येणार म्हणून येथील लोकांच्या आशा पल्लवीत झाल्या. मात्र, पाच वर्षांत या भागात एकही कारखाना आला नाही. या भागातील सर्व समस्या आणि प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत. विधानसभेत त्यांनी आपल्या भागातील एकही प्रश्न उपस्थित केला नाही. उलटपक्षी, सुशिक्षित बेरोजगार तरुणांकडून गोळा केलेल्या बायोडाटा पेपरची रद्दी काल-परवा थळ गावातीला एका रद्दीवाल्याने अलिबागला येऊन विकली. केवळ मतांसाठी तुम्ही तरुणांची फसवणूक करून त्यांच्या भावनांशी खेळलात. नोकरी लावायची नव्हती, रोजगार द्यायचं नव्हतं, तर निदान खोटं तरी बोलायचं नव्हतं. आता लोकांना कळून चुकलं आहे. लोकं एकदा फसली, परत-परत फसणार नाही. असं सांगत चणेरा भागात कारखानदारी आणू असे खोटे आश्वासन देणाऱ्यांनी मागील पाच वर्षांत किती तरुणांच्या हाताला रोजगार दिला का, असा रोकडा सवाल चित्रालेखा पाटील यांनी आ. महेंद्र दळवी यांना केला आहे.


Ref No. Date: 11/11/2024

**Securitisation Notice U/s 13(2) of SARFAEST Act 2022**

We, The Revdanda Co Op Urban Bank Ltd, Revdanda the secured creditor of Applicant mentioned in column no 1 below inform you all that your account has been classified as Non Performing Account in our accounts on 31 March 2011 pursuant to your defaults in making repayment of Principle and interest an amount of Rs. 25,18,076.50 is now due and payable by you as on 30/09/2024 together with further interest thereon to The Revdanda Co Op Urban Bank Ltd Revdanda.

Inspite of our repeated demands you have not paid the amount outstanding in your account and you have not discharged your abilities. We, therefore issued notice U/s 13(2) of chapter III of the Securitisation and Reconstruction of financial Assets and Enforcement of Security Interest Act 2002 on 03/10/2024 demanding payment of the above mentioned amount together with further interest applicable at contracted rates, costs, charges, other money to discharge your liabilities in full within 60 days from the date of the notice. But you both did not accept the said Register Notice of 03/10/2024

| | |
|---|---|
| 1. Name of Borrower Address | Mr. Pratap Balkrishna Nalavade<br>At Post Borli, Tal Murud Dist Raigad |
| 2. Name of Guarantor Address | Mr. Shirish Dharma Thakur<br>At Mahalunge Post Borli,<br>Tal Murud Dist Raigad |
| 3. Description of Immovable Property | Tukdi and District Raigad Pot Tukdi and Taluka Murud, in the area of Sub Ragistrar Murud, Raigad Zilla Parishad, Panchayat Samiti Murud, Mauje Borli the house No.503 of 300 sqft owned by Mr. Pratap Balkrishna Nalavade in Group Grampanchyat Borli and said house no.503 is in Mauje Borli gat no.208/16 Plot No 16 area 0.01.39 H.R. |
| 4. Account No. | 100219940000062 |
| 5. NPA Date | 31st March 2011 |
| 6. Amount Outstanding | Rs.25,18,076.50 |
| 7. Amount Outstanding as on | 30/09/2024 |
| 8. Rate of Interest | 17% |

Now the authorized officer of The Revdanda Co-Op Urban Bank Revdanda do hereby publish contents of the above demand notice as provided under Rules for discharge your liabilities in full failing which we shall without any further reference be constrained to enforce the above security created by you in our favour by exercising any or all the rights given under the said Act.

Please note that this Publication is made without prejudice to such rights and remedies as are available to The Revdanda Co Op Urban Bank Ltd Revdanda against the borrower and the guarantors of the said financial under law. You are further requested to note that as per section 13(13) of the said Act, you are restrained/prohibited from disposing of or dealing the above security or transferring by way of sale, lease or otherwise of above Secured asset without our prior written consent.

Date -11/11/2024 Authorised Officer
Place - Revdanda **The Revdanda Co Op Urban Bank Ltd Revdanda**

## स्नेहल जगताप यांना वाढता पाठिंबा



**महाड :** महाड विधानसभा मतदारसंघात ४ हजार पेक्षा जास्त नवीन मतदारांची नोंद झाली आहे. या नव मतदारांसह तरुणी व महिलांना आपला हक्काचा उमेदवार म्हणून स्नेहल जगताप यांना पाठिंबा दर्शविला आहे. तसेच, स्नेहल जगताप या शिक्षणासह रोजगार व आरोग्याचा प्रश्न मार्गी लावतील, असा विश्वास येथील मतदारांना आहे. यामुळे त्यांच्या प्रचारार्थ काढल्या जाणाऱ्या प्रचार रॅलीला जोरदार प्रतिसाद मिळत असल्याचे मत मयूर चांदोरकर यांनी व्यक्त केले आहे. संत रोहिदास नगर व आदर्श नगर या ठिकाणी सोमवारी (दि.११) सायंकाळी काढलेल्या प्रचार रॅली दरम्यान ते बोलत होते. महाड शहरातील प्रचाराची रंगत वाढू लागली असून सर्वच प्रभागांसह सोसायटीमध्ये स्नेहल जगताप यांच्या विजयाची चर्चा होत आहे. स्नेहल जगताप यांना किती मताधिक्य मिळणार या पेक्षा तीनवेळा आमदार असलेले भरत गोगावले किती मतांनी पडणार याची चर्चा रंगू लागली आहे. संत रोहिदास नगर येथे शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या प्रचारार्थ पुष्पलता जगताप, संध्याताई जगताप, विजया जगताप, भारती सकपाळ, महाडीक, नीता शेठ, तृप्ती रत्नपारखी, अस्मिता शिंदे, प्रमोद महाडीक, मयूर चांदोरकर, प्रवीण चांदोरकर, शेखर महाडिक यांसह पदाधिकारी व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तरूणांचा ठाकरे गटात प्रवेश



**महाड :** तालुक्यातील वाळण विभाग मतदारसंघाचा महाविकास आघाडीच्या उमेदवार स्नेहल जगताप यांचा प्रचार दौरा संपन्न झाला. या दौऱ्यामध्ये स्नेहल जगताप यांना तरूणांचा प्रचंड पाठिंबा मिळत आहे. दरम्यान, वाकीच्या बौद्धवाडी येथील मुंबईकर व स्थानिक भावकीनी स्नेहल जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षात प्रवेश केला आहे. यावेळी महाड उपतालुका प्रमुख चैतन्य म्हामुणकर, रायगड जिल्हा वाहतूक सेना प्रमुख सुभाष मोरे, महिला तालुका प्रमुख वर्षा कालप, उपतालुका महिला प्रमुख दिपाली शिंदे, माजी उपसभापती प्रिती कालगुडे, माजी पस सदस्य अपर्णाताई येरुणकर, अनिलजी येरुणकर, युवासेना तालुका समन्व्यक राकेश गायकवाड, विनोद भोसले, सुधीरभाऊ म्हामुणकर, अनिल जाधव, श्रीकांत ननावरे, प्रशांत कालगुडे, युवती तालुका प्रमुख सेजल तांबडे, पिंपळवाडी उपसरपंच कल्पेश पांगारे, मनोज चव्हाण, संतोष म्हामुणकर, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुंबई मंडळाचे अध्यक्ष अशोक मोरे, गाव अध्यक्ष बबन मोरे, महेश मोरे, मिलिंद मोरे, नरेश मोरे, आदर्श तांबे, भीमराव मोरे, राहुल मोरे, अक्षय मोरे, प्रणित मोरे, गणपत मोरे, दिपक शिंदे, सागर जाधव, सूरज मोरे, श्रीकांत मोरे, अभिषेक तांबे, आदर्श तांबे, दिपक मोरे, शशिकांत मोरे यांसह वाकी बौद्धवाडीच्या नागरीकांनी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षात प्रवेश केला आहे.

## म्हसळ्यात शरद पवार यांची जाहीर सभा

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल नवगणे यांच्या प्रचारार्थ १६ नोव्हेंबर रोजी म्हसळा येथे सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि गुहागर विधानसभा मतदार संघाचे आमदार भास्कर जाधव उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती म्हसळा तालुका अध्यक्ष अजहर धनसे यांनी दिली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार असल्याने आता प्रचाराला चांगलाच वेग आला आहे. महाविकास आघाडीतर्फे श्रीवर्धन विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाला जागा मिळाली असून माविआतर्फे अनिल नवगणे यांना उमेदवारी मिळाली आहे. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात महायुती तर्फे राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या उमेदवार आदिती तटकरे या निवडणूक लढवीत आहेत. यामुळे राष्ट्रवादी अजित पवार गट विरुद्ध राष्ट्रवादी शरद पवार गट असा सामना श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात रंगणार आहे. शरद पवार यांच्या सभेच्या माध्यमातून श्रीवर्धन मतदारसंघात निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाणार आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा थेट सामना होत आहे. यामुळे दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात प्रचाराचा झंझावत पाहायला मिळणार आहे.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- प्रथम पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे . अकाऊंटंट ( पेमेंट - १२००० ) हाऊस कीपर ( पेमेंट- ९५००) रिसेप्शन ( पेमेंट - १२०००) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२

- वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत १० वी १२ वी पास/नापास पगार १२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण- बामणसुरे, चोंढी नंबर- ९१४५४५०२९७/ ९५७९२५८८९२

- Design Metrics is Hiring. Need a Draftsman/ Sit Supervisor at our Studio in Alibag. Skills required - Autocad / Site knowledge. Kindly share your CV on designmetricsoffice@gmail.com. Contact No - 9970051876

- भारतगैस वितरक मे.जे.बी.जगे ॲण्ड सन्स्, अलिबाग फुलटाईम/ पार्ट टाईम कामासाठी मुले पाहिजेत संपर्क - ९३५९८८५६७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# उपक्रमांमधून मतदान जनजागृती

## जिल्हा परिषद शाळेसह माध्यमिक शाळेतून उत्स्फुर्त प्रतिसाद

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदार संघातील निवडणुक प्रक्रीया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन काम करीत असताना मतदानाचा टक्का वाढण्यासाठी प्रशासनाने कंबर कसण्यास सुरुवात केली आहे. रायगड जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांसह माध्यमिक शाळांमध्ये चित्रकला, मतदार शपथ, निवडणुक गीत, रांगोळी, पोस्टर, प्रश्न मंजूषा आदी विविध स्पर्धांबरोबरच पालकांना विद्यार्थ्यांकडून संकल्प पत्र आदी उपक्रम स्वीप कार्यक्रमांतर्गत राबवून मतदान जनजागृती करण्यात आली. या उपक्रमाला शाळांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.







निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात स्वीप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शाळांमध्ये मतदानाची प्रतिज्ञा घेणे, निवडणूक गीत वाजविणे, मान्यवर व्यक्ती, प्रसिध्द कलावंत खेळाडू यांच्याकडून मतदान करण्याचे आवाहन करणे अशा अनेक प्रकारचे उपक्रम विधानसभा मतदार संघात सुरु करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणजे जिल्ह्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून मतदानाचे महत्व पटवून देण्यासाठी शाळांमध्ये चित्रकला, पोस्टर, पालकांना संकल्प पत्र, प्रश्न मंजूषा सारखे उपक्रम सुरु करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील दोन हजारहून अधिक शाळांमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली असून हजारो विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेऊन गावे, वाड्यांमध्ये मतदान जनजागृती करून मतदान करण्याचे आवाहन केले आहे. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी सुरु केलेल्या या उपक्रमाचा फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

> **निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांतर्गत चित्रकला, व इतर स्पर्धा शाळांमध्ये घेण्यात आल्या. मतदानचा टक्का वाढविण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे.**
> **– कृष्णा पिंगळा**
> **गटशिक्षणाधिकारी, अलिबाग**



रायगड जिल्ह्यातील पनवेल, कर्जत, उरण, पेण, अलिबाग, श्रीवर्धन, व महाड या सात विधानसभा मतदार संघातील २४ लाख ८८ हजार ७८८ मतदार आहेत. यामध्ये १८ ते १९ वयोगटातील ५५ हजार ८९३ मतदार, ८५ वर्षापुढील ३५ हजार ८६३, दिव्यांग १३ हजार १९१ तसेच अनिवासी भारतीय २३३ मतदार आहेत. ७३ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत. बुधवारी (दि.२०) २ हजार ७९० केंद्रामध्ये मतदान होणार आहे. यामध्ये युवा, महिला व ८५ वर्षावरील मतदारांची भूमिका महत्वाची ठरणार आहे. मतमोजणी २३ नोव्हेंबरला होणार आहे.



● अलिबाग तालुक्यातील नवेदर बेली येथील तरुणांनी अलिबाग-मुरूड आणि रोहा मतदार संघातील उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून शेकापमध्ये जाहीर प्रवेश केला.

## जांभूळपाडा येथे प्रचाराचा शुभारंभ

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग-मुरुड आणि रोहा विधानसभा मतदारसंघाच्या मविआ पुरस्कृत शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना प्रत्येक गावोगावी प्रचार करताना मतदारांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. नुकताच अलिबाग तालुक्यातील परहूर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील जांभूळपाडा येथे चित्रलेखा पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ जे.पी. घरत यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आला. यावेळी माजी सरपंच विनोद खोपकर, तुषार नाईक, प्रकाश पाटील, सचिन पाटील, सुधीर पाटील, राजेंद्र पाटील, रविंद्र घोगले, विकास पाटील, तळवडे वि. का. सोसायटीचे चेअरमन शेखर पाशिलकर, चंद्रकांत पाटील, पराग पाटील, प्रशांत जाधव, बाळाराम पाटील, नरेंद्र पाटील यांसह मविआतील घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या सहभागी झाले होते.





● कर्जत विधानसभा मतदार संघातील मविआचे उमेदवार नितीन सावंत यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत कळंब जिल्हा परिषद प्रभागातील अंबेरपाडा गावातील कार्यकर्त्यांनी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षात सोमवारी (दि.११) जाहीर पक्षप्रवेश केला. यावेळी राजाराम शेळके, बाजीराव दळवी, माधव कोळंबे, संतोष घाडगे, गणेश मोडक रामदास ठोंबरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेवदंडा पोलिसांचा रूट मार्च

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीसाठी पोलिस यंत्रणा सज्ज झाली असून रेवदंडा पोलिसांकडून रूट मार्च करण्यात आला. यावेळी रेवदंडा पोलिसांनी बाजारपेठ ते चौल नाका असे रूट मार्चचे आयोजन केले होते. रेवदंडा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहा. पोलिस निरिक्षक श्रीकांत किरविले यांच्या नेतृत्वाखाली या रूट मार्चला सायकांळी ५ वाजता प्रारंभ करण्यात आला. या रूटमार्चमध्ये उपनिरिक्षक नंदगावे, उपनिरिक्षक म्हशीलकर, उपनिरिक्षक गांगुर्डे, सिआयएफ जवान, आरसीपी जवान, स्थानिक पोलिस, पोलिस अधिकारी व अमंलदार यांनी सहभाग घेतला होता.

## नेरळ गावात मविआची प्रचार फेरी



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत यांच्या प्रचारार्थ नेरळ गावात प्रचार फेरी काढण्यात आली होती. या रॅलीत शिवसेना (उद्धव ठाकरे), काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कर्जत विधानसभा मतदारसंघातील मविआचे उमेदवार नितीन सावंत यांच्या प्रचाराची फेरी नेरळ गावात आयोजित करण्यात आली होती. नेरळ गावातील टेप आळी, पाडा, मातोश्री नगर तसेच राजेंद्र गुरूनगर, ब्राम्हण वाडी, कुंभार आळी, बाजारपेठ, खांडा, मोहाची वाडी आणि ममदापुर ग्रामपंचायत हद्दीत जाऊन प्रचार करण्यात आला. यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उप तालुका प्रमुख सुरेश गोमारे, तालुका उप संघटक सुधाकर देसाई, काँग्रेस पक्षाचे कर्जत तालुका अध्यक्ष संजय गवळी, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेरळ अध्यक्ष संतोष मिसाळ यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

## पहिल्या जत्रौत्सवाचे आयोजन



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यातील पहिल्या जत्रौत्सवाचे आयोजन सवाद गावातील श्रीशंकराच्या मंदिराच्या यात्रेने त्रिपुरारी पौर्णिमेच्या मुहूर्तावर होत असते. तालुक्यातील या पहिल्या जत्रौत्सवाला दरवर्षी सप्तक्रोशी विभागातील सर्वधर्मिय भाविकांसोबत मुंबई, ठाणे, पुणे तसेच गुजरात राज्यातील चाकरमानी भाविकांचीदेखील मोठया संख्येने गर्दी होत असते. यंदा १५ नोव्हेंबर रोजी पोलादपूर तालुक्यातील पहिल्या यात्रेचे आयोजन होणार आहे.

यंदाही कार्तिक त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी लाखोंच्या संख्येने भाविक येणार असल्याने श्रीशंकर महाबळेश्वर देवस्थान ट्रस्ट सवाद यांच्यावतीने आयोजनाची जोरदार तयारी सुरू झाली आहे. सकाळी कमळ वाहून श्रीविष्णू पूजन झाल्यानंतर सायंकाळी हरिपाठ व त्यानंतर त्रिपूराप्रज्वलन व आरती, विविध भजन झाल्यानंतर मध्यरात्री १२ ते पहाटे २ वाजेपर्यंत श्रीशंकराची पालखी मिरवणूक काढली जाते.

## धाकटी पंढरीत भक्तांचा मेळा

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

धाकटी पंढरी येथे विठ्ठल रखुमाईचे मंदीर असून हे ताकई-साजगांव गावापुरते मर्यादित न राहता व्यापक नावाने महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. आषाढी व कार्तिकी एकादशी मोठ्या उत्साहात विठ्ठल नामाच्या गजरात साजरी होत असते. या वर्षी कार्तीकी एकदशी निमित्ताने धाकटी पंढरीत भक्तमेळा भरला आहे. कार्तिकी एकदशीच्या आदल्या दिवशी ताकई गावातील कै. देहू कुशाबा पाटील यांच्या निवसस्थानी माऊलीच्या पादुकांची पालखी आगमन झाले. यानंतर पाटील कुंटूबांयांनी माऊलीची यथोचित पुजा केली. यावेळी रात्री प्राजंल सोमवंशी यांचे किर्तन सादर झाले. यानंतर माऊलीच्या पादुकांची पालखी ताकई गावाला प्रदर्शना घातल्यावर पालखीचे प्रस्थान धाकटी पंढरी मंदीरात करण्यात आले.

## शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

**। महाड । प्रतिनिधी ।**

विन्हेरे जिप मतदारसंघाचा महाविकास आघाडीच्या उमेदवार स्नेहल जगताप यांचा प्रचार दौरा संपन्न झाला. या दौऱ्यामध्ये तरुणांचा प्रचंड पाठिंबा स्नेहल जगताप यांना मिळत आहे. याचबरोबर करंजाडी सुतारकोंड येथील शिंदे गटाचे शवसैनिक अनिल सविलकर, सुनील निटुस्कर यांच्यासह असंख्य शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी पक्ष प्रवेश केला आहे. यावेळी कृउबा समिती सभापती श्रीधर सकपाळ, अमित मोरे, सोमनाथ ओझर्डे, साधना वरसकर, ॲड. मंगेश हुमणे, परशुराम बेल, वर्षा कालप, श्रीयश जगताप, सुरेखा पवार, स्नेहा मनवे, प्रफुल धोंडगे, वसंत बटावले, सचिन पवार, महेंद्र जोगळे, सुनील जाधव, अनिल बेल, भाऊ करंजाडकर, अमृत मांडवकर, चंद्रकांत मांडवकर आदी उपस्थित होते. या प्रवेशसाठी नजीर कावळेकर, तुकाराम बुवा खेडेकर, युसूफ पोशीलकर, सलीम कोंडेकर, अनिल बेल आदींनी मेहनत घेतली.



### बाजारपेठेत साहित्य खरेदीची लगबग

# तुळशी विवाह सोहळ्याला प्रारंभ

**। उरण । वार्ताहर ।**

**तुळस ही आपल्या सर्वगुण संपन्न वृंदेप्रमाणे आहे. श्रीविष्णू यांना तुळस अतिप्रिय म्हणून तिला हरिप्रिया म्हणतात. पुढे वृंदा हिनेही द्वापार युगात रुक्मिणीच्या रूपाने अवतरून विष्णूचा अवतार जो श्रीकृष्ण त्यास कार्तिक शुध्द द्वादशीच्या दिवशी वरले. अशा प्रकारे, हिंदू लोक रुक्मिणी–कृष्ण विवाह, तुळशी विवाह विधीच्या रूपाने साजरा केला जातो.**

उरण शहर हे सांस्कृतिक दृष्ट्या नटलेले शहर आहे. येथे अनेक प्रथा परंपरा तसेच सण उत्सव आनंदात साजरे केले जातात. तुळशी विवाहाची परंपरा उरण तालुक्यात मोठ्या उत्साहात पार पाडली जात असून, तुळशी विवाहांनंतरच उरण तालुक्यात विवाहाच्या बोलचाली केल्या जात असल्याचेही निदर्शनास येत आहे. बुधवार दि.१३ नोव्हेंबर पासून या विवाहाला प्रारंभ होत असून उरण मधील बाजारपेठही तुळशी विवाहाच्या साहित्याने नटली आहे. तुळशी विवाह सोहळ्यासाठी तुळशीच्या शोड शोपचार पूजा करण्यासाठी, सौभाग्यलेणे, नवीन साज, ओटी हे साहित्य देखील पाहायला मिळतं आहे.



यादम्यान घराघरात लगबग पाहायला मिळत आहे. सोहळ्यासाठी नागरिकांनी तुळशी वृंदावन सारवून, स्वच्छ करून सुशोभित करण्यास सुरवात केली आहे. त्याचप्रमाणे उरणच्या बाजारपेठेत ऊस, आवळे, चिंचा विक्रीसाठी आले आहेत. विशेष म्हणजे तुळशी विवाहासाठी झाडांच्या नर्सरीमध्ये तुळशीच्या रोपे मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहेत.

> **तुळशी विवाहामुळे सध्या नागरिकांचा नवीन तुळशीचे रोपटे घेण्याकडे अधिक कल आहे. यामुळे नर्सरीत इतर झाडे घेण्यापेक्षा तुळशीचे रोपटे घेण्यासाठी गिऱ्हाईक येत आहे. अनेक लोकं तुळशीचे नवीन रोपटं तुळशीच्या लग्नानिमित्त घेऊन स्वतःच्या अंगणातील कुंडीत लावतात.**
> **– रामरतन तिवारी,**
> **नर्सरी वृक्ष विक्रेते, उरण**

# एसटी-कारचा भीषण अपघात



## सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही

**। पाली । वार्ताहर ।**

ठाणे कोशिंबले पाली एसटी बस आणि आल्टो कारमध्ये शुक्रवारी (दि.८) भीषण अपघात झाला. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही मात्र आल्टो कार चे प्रचंड नुकसान झाले आहे.

ठाणे पालीवरून कोशिंबलेला जात असलेली एसटी बस व कोशिंबलेवरून पालीच्या दिशेने जात असलेली मारुती सुझुकी कंपनीची आल्टो कार नागशेत गावच्या हद्दीत समोरासमोर एकमेकांना धडकून भीषण अपघात झाला. वळणावरून दोन्हीही वाहन चालकांना वाहन न दिसल्याने हा अपघात घडला. या अपघाताची तीव्रता इतकी होती की त्या धडकेत आल्टो कारची एयरबॅग उघडली. त्यामुळे कार चालक व सहप्रवासी थोडक्यात बचावले. कारमध्ये चालक व त्यांची पत्नी असे दोघेजण होते. दोघेही सुखरुप असून, चालक यांच्या पत्नीच्या हाताला दुखापत झाली आहे. मात्र, या अपघातात कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तर एसटी बसचेदेखील समोरील भागाचे नुकसान झाले आहे.

पाली ते कोशिंबले जवळपास २० किमी अंतर आहे. नांदगाववरून कोशिंबले ला जाण्याचा मार्ग हा वळणावळणाचा व चढ-उताराचा आहे. रस्ता हा अरुंद असून, रस्त्यालगत झाडे झुडूपे खूप आहेत. त्यामुळे समोरून येणारी वाहने पटकन दिसत नाहीत. परिणामी, वाहने चालविताना अपघाताची दाट शक्यता असते. नांदगाव ते कोशिंबले मार्गादरम्यान एखादे मोठे वाहन भरधाव वेगात आले तर दुसऱ्या वाहनाला बाजूला उभे राहायला जागा नसते.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-मांडवणे,तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| जिवनलता नंदकिशोर कागलीवाल | २० | १० | ३-११-०० पो.ख ०-४४-०० एकुण ३-५५-०० पैकी ०-४०-१७ | २-१३ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १२/११/२०२४
अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक सखाराम कानू रोकडे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे-

**मौजे - जांभिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्र व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ४१/३ | एकुण क्षेत्र ०-२८-६० हे आर पॉ | ४-३७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १३/११/२०२४
**अॅड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली स्थावर मिळकत मौली गुप्ता व अंबरीश गुप्ता यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीची मिळकत असून सदरची मिळकत आमचे अशिलांनी त्यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

मौजे किहीम ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ४१६ हिस्सा नं. १, क्षेत्र ०-२१-० हे. आर. (२१०० चौ.मी.) व सर्व्हे नं. ४१५ क्षेत्र ०-९५-९ हे.आर. (९५९० चौ.मी) एकुण क्षेत्र ११६९० चौ.मी. या मिळकतीवरील ''पॅरॅडीसो बे'' मधील ''बे ४'' या इमारतीमधील डी विंग मधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रमांक १०३ क्षेत्र ५५८ चौ.फुट कारपेट ही मिळकत. (ब्लॉक नं. १०३) ज्याचा ग्रुपग्रामपंचायत किहीम हद्दीतील मौजे किहीम येथील मालमत्ता क्रमांक २३२८/५१ क्षेत्रफळ ५१.८६ चौ.मी. ५५८ चौ.फु. ही मिळकत.

वर नमुद मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहीवाट, ताबा, बयाणा पावती, रजिस्टर्ड अगर अनरजिस्टर्ड साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बोजा, बक्षीस, मृत्युपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लीज, लियन, अन्नवस्त्र-पोटगी, वारसाहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे त्यांचे नमुद पत्त्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमुद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरुपात न कळविल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजुन तसेच सदर मिळकतीशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग, सही/-
दिनांक :- १३.११.२०२४
**अॅड. जयवंत ह. घरत**
एम.ए., एल एल.एम.
बी/१०२,''चित्रा-तारांगण'' महर्षी कर्वे रोड,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

# किशोर ठाकूर यांच्या शिल्पांचे प्रदर्शन



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण उंबर्डे येथील शिल्पकार किशोर ठाकूर यांच्या समग शिल्पांचे प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी काळाघोडा चौक मुंबई येथे लागला आहे. एकूण सहा शिल्प या प्रदर्शनात ठेवण्यात आली असून, ही सहाही शिल्प किशोर ठाकूर यांची स्वयंनिर्मीत आहेत. हे प्रदर्शन १२ ते १८ नोव्हेंबरदरम्यान सकाळी ११ ते सायंकाळी ७ पर्यंत विनामूल्य सर्वांसाठी खुले राहणार आहे. तरी, जास्तीत जास्त कलाप्रेमींनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालकांकडून खरेदी घेणेचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकानी माझे अशिलांना दिलेला आहे.

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मौजे नागाव, ता. अलिबाग येथील :-

| विद्यमान मालकाचे नाव | भूमापन क्रमांक | क्षेत्र हेक्टर आर चौरस मिटर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मधुरा दिवाकर आपटे | २४६१ | ०-४९-६० पैकी ०-०७-१० | २.७८ |
| १. राहन भास्कर रायकर २. मधुरा दिवाकर आपटे | २४६१ | ०-४९-६० पैकी ०-०७-० | २.७४ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- १२/११/२०२४
**अॅड. निलेश अशोक म्हात्रे**
''गृरूकृपा', महर्षी कर्वे रोड
अलिबाग- रायगड
मोबा. नं. ९८५०४८६९४२

### नोटीस

दिनांक १३/११/२०२४

सर्व जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे कुंभोशी, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक भारत तुकाराम घरत यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/ गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे कुंभोशी, ता. रोहा, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कुंभोशी, ता. रोहा | ८७ | क्षेत्र २-६८-०० पो.ख. २-०४-०० एकूण क्षेत्र ४-७२-० | १.७७ |

वर नमुद मिळकतीपैकी भारत तुकाराम घरत यांच्या हिश्श्याचे क्षेत्र २-४८-०० हे.आर., पो.ख. २-०४-०० हे. आर. एकूण क्षेत्र ४-५२-०० हे. आर., आकार १.६४ ही मिळकत

दिनांक :- १३/११/२०२४
**अॅड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग - रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

### नोटीस

दिनांक १३/११/२०२४

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे कुंभोशी, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १. प्रविण रमणिकलाल पटेल, २. मुकंद रमणिकलाल पटेल यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी- विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/ गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे कुंभोशी, ता. रोहा, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कुंभोशी, ता.रोहा | १०३ | क्षेत्र ०-१६-०० पो.ख. ०-०६-०० एकूण क्षेत्र ०-२२-०० | ०.०९ |
| | ९३ | क्षेत्र ०-३८-०० पो.ख. ०-०६-१० एकूण क्षेत्र ०-४४-१० | ५.५९ |
| | ९८ | क्षेत्र ०-५०-०० पो.ख. ०-०१-०० एकूण क्षेत्र ०-५१-०० | ०.३९ |

दिनांक :- १३/११/२०२४
**अॅड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे. एस. एम कॉलेज जवळ
अलिबाग - रायगड, मोबा. ९७६७०१०९०२

### नोटीस

दिनांक १३/११/२०२४

सर्व जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे कुंभोशी, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक मुकेश मदनराज मेहता यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे कुंभोशी, ता. रोहा, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कुंभोशी, ता. रोहा | ९१ | क्षेत्र २-६९-०० पो.ख. २-०४-०० एकूण क्षेत्र ४-७३-०० | १.७७ |

दिनांक :- १३/११/२०२४
**अॅड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग - रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी मौजे बेलवडे बुद्रुक, ता. पेण, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. ज्योस्ना अशोक थोरात, सौ. वैशाली रमाकांत रोकडे, सौ. निता रविंद्र थोरात यांचेकडुन खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लीयन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्युपत्र, ताबा, वहिवाट, विकसनाचा हक्क, अदलाबदल, वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधीचे लेखी हरकती खालील पत्त्यावर प्रमाणित कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकतींवरील तथाकथीत हक्क सोडून दिले आहेत आणि मिळकतीवर विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कसलाही मालकीहक्क, अधिकार नाही आणि सदरहू मिळकती निर्वेध आहेत असे समजून सदर मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल आणि त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे बेलवडे बुद्रुक, ता. पेण, जि. रायगड येथील तलाठी सजा बेलवडे बुद्रुक यांचे हद्दीतील-

| गट नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १३६ | ०-८७-८० | १८.१३ |

पैकी वर नमूद मालकांच्या हिश्श्याचे क्षेत्र ०-५४-८० हे.आर.चौ.मी., आकार रू. १०-७६ पै.

अलिबाग
दिनांक :- १२/११/२०२४
**अॅड. रविंद्र विनायक ओक**
पत्ता : 'गुरूकृपा',महर्षी कर्वे रोड,
अलिबाग अर्बन बँकेचे शेजारी,
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक रुपाली विनय सासवडकर यांजकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर. (आर. चौ.मी) | आकार (रू.पै.) | विद्यमान मालक |
|---|---|---|---|---|
| रेवदंडा ता.अलिबाग | १३०/३ | क्षेत्र ०-०५-०० पो.ख.०-००-१० एकूण क्षेत्र ०-०५-१० | ३.०९ | रुपाली विनय सासवडकर |

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. कळावे,

अलिबाग,
तारीख : १२/११/२०२४
**(अॅड. सागर विजय पाटील)**
पत्ता : मु. घर नं. १६०६, लालबाग,
ब्राह्मण आळी, ता. अलिबाग, जि.
रायगड. मो. नं. ९९२२५६७८९१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक मेघा माधव सुगवेकर व निखील माधव सुगवेकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

मौजे- नालधे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| भूमापन क्र व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ४२/६ | एकुण क्षेत्र ०-९०-०० हे आर पॉ | ०-५२ |
| ४५/२ | एकुण क्षेत्र ०-१३-७० हे आर पॉ | ०-६६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास इरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १३/११/२०२४
**अॅड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९ तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### नोटीस

दिनांक १३/११/२०२४

सर्व जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे आरे बुद्रुक, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १. सुमित्रा एम. जैन, २. करुना आर. जैन यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे आरे बुद्रुक, ता. रोहा, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आरे बुद्रुक, ता. रोहा | १६७ | क्षेत्र १६-१५-०० पो.ख. ४-४२-०० एकूण क्षेत्र २०-५७-०० | ११.८२ |

दिनांक :- १३/११/२०२४
**अॅड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकतीतील खाली नमुद मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सिटी सर्व्हे नं. | एकुण क्षेत्र (चौ.मीटर) | सत्ता प्रकार | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| १) अलिबाग, ता. अलिबाग | ९६१/१ | ३७.६० | ए | १) नित्यानंद माधव कामत २) राम माधव कामत |
| २) अलिबाग, ता. अलिबाग | ९६१/३ | ५०.१७ | सी | ३) लक्ष्मण माधव कामत ४) विना श्रीनिवास राव |
| ३) अलिबाग, ता. अलिबाग | ९६१/के | १०२.०० | ए | ५) राधिका रामचंद्र किणी ६) शांता राया कामत ७) अनुराधा राया कामत ८) प्रिया राया कामत |

सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १२/११/२०२४
**(अॅड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता -श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./ हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| झिराड | १९१/२ | ०-२५-०० पो.ख. ०-०४-७० ०-२९-७० | ४.०६ | विलास नामदेव गावडे |
| झिराड | १९१/१ | ०-३७-८० पैकी दक्षिणेकडील ० हे. ११.३० आर एवढी मिळकत. | ६.१४ | निखिल अशोककुमार डालमिया |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणा व्यक्ती, व्यक्ती समुह, बँक, वित्तीय संस्था, पतसंस्था, पतपेढी, यांचा अथवा अन्य कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, विकसन करार, संयुक्त उपक्रम, भागिदारी, वारसा हक्क, लिज, लिएन, पॉन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, जाण्या-येण्याच्या वहिवाटीच्या रस्त्याचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

सही/-
अलिबाग
तारीख : १३/११/२०२४
**अॅड. गणेश गोविंद पाटील**
ए/१, २, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, रायगड, ४०१ २०१.

# गतविजेत्या भारतीय संघाची विजयी सलामी

## मलेशियाचा उडवला धुव्वा



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**गतविजेत्या भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स करंडक स्पर्धेत सोमवारी (११ नोव्हेंबर) विजयी सलामी दिली. भारतीय महिला संघाने मलेशियन संघाचा ४-० असा धुव्वा उडवला. अन्य लढतींमध्ये जपान - दक्षिण कोरियामध्ये २-२ अशी बरोबरी झाली. तसेच चीनने थायलंडवर १५-० असा दणदणीत विजय साकारला.भारतीय महिला संघाच्या विजयात संगीताकुमारी, प्रीती दुबे व उदीता यांनी दमदार गोल करीत मोलाचा वाटा उचलला.**

संगीताकुमारीने आठव्या व ५५व्या मिनिटाला गोल केले. प्रीती दुबे हिने ४३व्या मिनिटाला गोल केला. तसेच उदीता हिने ४४व्या मिनिटाला गोल केला. आता भारतीय महिला संघाशी पुढील लढत उद्या (ता. १२) दक्षिण कोरियाशी होणार आहे.भारतीय महिला संघाने सावध सुरुवात केली. मलेशियाच्या नूर मोहम्मद हिला गोल करण्याची पहिली संधी मिळाली. मात्र भारताची गोलरक्षक सविता हिने मलेशियाचे आव्हान समर्थपणे थोपवून लावले.

मलेशियाला पेनल्टी कॉर्नरही मिळाला. पण त्याचेही गोलमध्ये रुपांतर करण्यात अपयश आले. आठव्या मिनिटाला दीपिका हिने गोल करण्याचा प्रयत्न केला. याच दरम्यान संगीताकुमारी हिने संधीचा फायदा घेत भारतासाठी पहिला गोल केला व आघाडी मिळवली.भारतीय महिला संघाने मलेशियन संघावर सातत्याने आक्रमण केले. प्रीती दुबे हिच्याकडे गोल करण्याची दोन वेळा संधी होती. पण तिला यश मिळवता आले नाही. कर्णधार सलीमा टेटे हिलाही एक पेनल्टी कॉर्नर मिळाला. तेथेही निराशा झाली.

भारतीय महिला संघाने दुसऱ्या क्वार्टरमध्येही गोल करण्याचे प्रयत्न केले. पेनल्टी कॉर्नरवर नेहा हिला गोल करता आला नाही. त्यामुळे मध्यांतराला भारतीय संघाच्या गोलांमध्ये भर पडली नाही. तरीही यजमान भारतीय संघाकडे १-० अशी आघाडी कायम होती..तिसऱ्या क्वार्टरमध्ये दोन गोलया लढतीत भारतीय महिला संघाचे वर्चस्व प्रकर्षाने दिसून आले. तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारतीय संघाने दोन गोल केले. प्रीती दुबेने ४३व्या मिनिटाला, तर उदीता हिने ४४व्या मिनिटाला गोल केला. भारताला ३-० अशी आघाडी मिळवता आली. चौथ्या क्वार्टरमध्येही भारतीय महिला संघाने गोल करण्यासाठी मेहनत केली.

सामना संपायला १० मिनिटे बाकी असताना भारतीय संघाला पेनल्टी कॉर्नर मिळाला. पण यावर गोल करता आला नाही. अखेर ५५व्या मिनिटाला संगीताकुमारीने दोन बचावपटूंना भेदत भारतासाठी चौथा गोल केला. भारतीय संघाने ४-० असा दिमाखदार विजय साकारला.

# लॉकी फर्ग्यूसनची हॅटट्रिक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्यूसन याने टी २० क्रिकेटमध्ये मोठा कारनामा केला आहे. रविवारी १० नोव्हेंबरला श्रीलंका विरुद्ध न्यूझीलंड सामना दुसरा टी २० सामना खेळवण्यात आला. न्यूझीलंडने हा सामना जिंकला. न्यूझीलंडच्या फलंदाजांनी श्रीलंकेच्या गोलंदाजांसमोर गुडघे टेकले. त्यामुळे न्यूजीलंड १०८ धावांवर ऑलआऊट झाली. मात्र त्यानंतरही चिवट गोलंदाजीच्या जोरावर न्यूझीलंडने या १०८ धावांचा यशस्वी बचाव केला. न्यूझीलंडने हा सामना ५ धावांनी जिंकला.



लॉकी फर्ग्यूसन याने या विजयात निर्णायक भूमिका बजावली. लॉकीने २ वेगवेगळ्या ओव्हरमध्ये सलग ३ बॉलमध्ये ३ विकेट्स घेतल्या.

लॉकी फर्ग्यूसन याने श्रीलंकेच्या डावातील सहाव्या षटकातील शेवटच्या चेंडूवर कुसल परेरा याला बाद केलं. त्यानंतर लॉकीने आठव्या ओव्हरमधील पहिल्या आणि दुसऱ्या बॉलवर कामिंदु मेंडीस आणि कॅप्टन चरिथ असलंका या दोघांना आऊट केलं.

लॉकीनेकामिंदुलाएलबीडब्ल्यू आऊट केलं. लॉकीने त्यानंतर दुसऱ्याच बॉलवर कॅप्टन चरीथ असलंका याला विकेटकीपरच्या हाती कॅच आऊट केलं आणि हॅटट्रिक पूर्ण केली.

लॉकी फर्ग्यूसन टी २० क्रिकेटमध्ये हॅटट्रिक घेणारा एकूण पाचवा गोलंदाज ठरला आहे. न्यूझीलंडसाठी जेकब ओरम याने पहिल्यांदा टी २० मध्ये हॅटट्रिक घेण्याची कामगिरी केली होती. तसेच साऊथी, ब्रेसवेल आणि मॅट हॅन्री यांनीही ३ बॉलमध्ये ३ विकेट्स घेतल्या आहेत. लॉकी फर्ग्यूसनची टी २० क्रिकेटमध्ये हॅटट्रिक घेण्याची दुसरी वेळ ठरली.

# शेलू येथील किल्ले बांधणी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील शेलू या गावामध्ये स्थानिक तरुण कृष्णा बोराडे आणि सिद्धेश हिरेमठ यांनी पुढाकार घेऊन तरुण आणि बालगोरपाल यांच्यासाठी किल्ले स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेला शेलू तसेच बांधिवली गाव आणि नव्याने वसलेल्या वसाहती मधील तरुणांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत फ्रेंड्स फॅमिली ग्रुपने बनवलेला किल्ला प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला आहे.



किल्ले बांधणी स्पर्धा २०२४चे आयोजन करण्यात आले होते. शेलू गावातील कृष्णा लक्ष्मण बोराडे आणि सिद्धेश हिरेमठ यांनी पुढाकार घेऊन ही स्पर्धा बच्चे कंपनीसाठी आयोजित केली होती. दिवाळीमध्ये शेलू तसेच बांधिवली गाव परिसरात जाऊन परीक्षकांनी किल्ल्यांची पाहणी केली. त्यांनतर तयार करण्यात आलेल्या निकालामध्ये फ्रेंड्स फॅमिली ग्रुप प्रथम क्रमांक, साईभक्त ग्रुप द्वितीय क्रमांक, शिवभक्त ट्रकर्स ग्रुप तृतीय क्रमांक, वेदांत अनिल मसणे चतुर्थ क्रमांक, ऋषभ दत्तात्रय शेकटे याने पाचवा क्रमांक मिळविला. तर स्पर्धेत सहभागी सर्वांना उत्तेजनार्थ म्हणून सन्मानित करण्यात आले.

कृष्णा बोराडे, सिद्धेश हिरेमठ, साई हिरेमठ, मनोज शेकटे, रोशन मसणे, रवी मसने, नरेश मसणे, अनिल बुवा मसणे, अक्षय हिसाळगे, रमेश भोईर, मनोज तरे, रोशन मसणे, प्रशांत मसणे, हर्षद कांबरी, दिनेश कांबरी, शुभम शेलार, विजय मसणे, सुधाकर कराळे आदी तरुण किल्ले स्पर्धेचे आयोजनात होते.

मुंबई विभागीय कराटे स्पर्धा

# स्वरा विरकुडची झाली निवड

**मुरुड जंजिरा :** मुरुड तालुक्यातील मजगावच्या नाज ॲकॅडमी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील स्वरा निशांत विरकुड हिने पेण येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धेत १७ वर्षा खालील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक मिळवल्याने तिची मुंबई विभागीय कराटे स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. १७ वर्षांखालील मुलांच्या कराटे स्पर्धेत याच विद्यालयाचा विद्यार्थी विनीत विनायक पवार याला तिसरा क्रमांक मिळाला. या विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षक सेन्साय सनी खेडेकर, विद्यालयातील शिक्षक आशिष बुल्लु यांनी मार्गदर्शन केले. तर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मेघा भंडारे व सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

शालेय कराटे स्पर्धेत

# जय शोटोकान अँड स्पोर्ट अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे यश

**। पेझारी । वार्ताहर ।**

तालुका क्रीडा संकुल पेण येथे शालेय कराटे स्पर्धेत जय शोतो कान कराटे अँड स्पोर्ट अकॅडमी या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. यामध्ये ना. ना. पाटील हायस्कूल पेझारी शाळेची विद्यार्थिनी कुमारी तन्मई सुधीर पाटील (पेढांबे) १९ वर्षांमध्ये ५५ किलोमध्ये सुवर्णपदक पटकावले .

तसेच कारमेल स्कूल खोपोली मधील आरुषी अमोल चौधरी लवजी खोपोली चौदा वर्षांमध्ये ६० किलो मध्ये सुवर्ण पदक पटकावले या दोघींची मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तसेच नीर्जा प्रल्हाद कोळी महात्मा गांधी विद्यालय हाशिवरे सिल्वर मेडल प्राप्त केले.



चिंतामणी केळकर विद्यालयाची स्वरा प्रयाग वारगे ब्राह्मण आळी अलिबाग ही रौप्य पदकाची मानकरी ठरली. चार्वी प्रवीण पाटील शाळा चिंतामणी केळकर विद्यालय अलिबाग हिने कांस्यपदक पटकावले. अरुण कुमार वैद्य हायस्कूलचा कैवल्य संदीप पाटील चौल याने रौप्यपदक प्राप्त केले.

तेजल निलेश पाटील लोणारे हिने कराटे फाइट्समध्ये कांस्यपदक पटकावले. ती अरुण कुमार वैद्य अलिबाग हायस्कूलची विद्यार्थिनी आहे. तसेच किंजल निवास टिवलेकर थेरोंडा हिने कांस्यपदक पटकावले. किंजल ही अरुण कुमार वैद्य इंग्लिश मीडियम हायस्कूलची विद्यार्थिनी आहे. जिग्नेश गजानन कोळी अलिबाग कोळीवाडा शाळा अरुण कुमार वैद्य जिग्नेशचा तिसरा क्रमांक आला. या सर्व कराटे खेळाडूंचे आंतरराष्ट्रीय रेफ्री हंशी परमजीत सिंग ठाणे तसेच जिल्हा संघटनेचे सचिव आणि कराटे मुख्य प्रशिक्षक संतोष कवळ अलिबाग यांनी विजयी अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. रोहन गुरव, रजिता अरुण गौड, वेदिका कवळे, सोनू कामी, जिज्ञासा पाटील, श्रमिका पाटील, अशांक अशोक पाटील यांनी कराटे रेफ्री आणि टेबलवर काम केले.



# अफगाणिस्तानच्या सलामीवीराचं विक्रमी शतक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अफगाणिस्तान संघातील स्टार सलामीवीर बॅटर रहमनुल्लाह गुरबाझ याने शतकी खेळीसह धमाकेदार कामगिरीची नोंद केली. ज्या ज्या वेळी त्याची बॅट तळपते त्या त्या वेळी अफगाणिस्तानच्या संघ विजयी ठरला आहे. हा खेळाडू अफगाणिस्तानचा ट्रम्प कार्डच आहे. पुन्हा एकदा त्यानं आपल्या बॅटिंगची खास झलक दाखवून दिली. त्यानं केलेली शतकी खेळी संघासाठी उपयुक्त ठरलीच. याशिवाय त्याने खास विक्रमही आपल्या नावे केल्याचे पाहायला मिळाले.

शारजाहच्या मैदानात रंगलेल्या बांगलादेश विरुद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यात रहमनुल्लाह गुरबाझच्या भात्यातून शतकी खेळी पाहायला मिळाली. या खेळीसह एका डावात त्याने रन मशिन विराट कोहलीचा विक्रम तर मोडलाच पण क्रिकेटचा देव आणि मास्टर ब्लास्टर या नावाने क्रिकेटमध्ये वेगळी छाप सोडणाऱ्या सचिन तेंडुलकरलाही त्याने मागे टाकले आहे.

रहमनुल्लाह गुरबाझनं २३ वा बर्थडे साजरा करण्यापूर्वी वनडेत ८ वे शतक झळकावत मास्टर ब्लास्ट सचिन तेंडुलकर आणि दक्षिण आफ्रिकेचा स्टार विकेट किपर बॅटर क्विंटन डिकॉक यांची बरोबरी केलीये.

या दोघांनी २२ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामन्यात ८ शतके झळकावली होती. विराट कोहलीनं वयाच्या २२ व्या वर्षी वनडेत ७ शतक झळकावली होती. आठव्या शतकासह गुरबाझनं त्याचा विक्रम मोडित काढला आहे.

# भारताच्या निर्णयानंतर पाकिस्तान स्पर्धेचे यजमानपद गमावणार?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी पाकिस्तानात जाण्यास नकार दिल्यानंतर पाकिस्तान सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. सुत्रांच्या माहितीनुसार पाकिस्तान सरकारने क्रिकेट बोर्डाला स्पर्धेतून माघार घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आगामी चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन आयसीसी दुसऱ्या देशात करण्याची शक्यता आहे.आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला ई-मेलद्वारे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या निर्णयाची माहिती दिली. त्यामुळे पाकिस्तान क्रिकेटमधील वातावरण चांगलेच तापले आहे.भारताच्या नकारामुळे पाकिस्तानही आता स्पर्धेतून माघार घेण्याच्या तयारीत आहे. त्यामळे पाकिस्तानला स्पर्धेचे यजमानपद गमवावे लागू शकते.

# सलग तीन विजयानंतर चौथ्या सामन्यात यु मुम्बाचा पराभव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

कोपरारक्षक महंमदरेझा शाडलुईच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर प्रो कबड्डी लीगमधील सोमवारी झालेल्या लढतीत हरियाना स्टीलर्सने यू मुंबाची विजयी घोडदौड ४८-३९ अशी रोखली. यू मुंबाकडून केवळ अजित चौहान यालाच चमक दाखवता आली. या चमकदार विजयाने हरियाना स्टीलर्सने ३१ गुणांसह गुणतक्त्यात आघाडी मिळवली. अन्य लढतीत पाटणा पायरेट्स संघाने गुजरात जायंट्स संघावर ४०-२७ असा विजय साकारला.



या सामन्याच्या पूर्वार्धातील अखेरच्या १० मिनिटांत आणि उत्तरार्धातील पहिल्या १० मिनिटांत यू मुंबावर चढवलेले लोण हरियाना स्टीलर्सच्या विजयात निर्णायक ठरले. या दोन्ही टप्प्यात हरियाना स्टीलर्सने प्रत्येकी १४ गुणांची कमाई केली. संपूर्ण सामन्यात शाडलुईची अष्टपैलू कामगिरी आणि यू मुंबाच्या अजित चौहानच्या पूर्वार्धातील चढाया आकर्षक ठरल्या. शाडलुईने बचावात ६ आणि चढाईत ४ अशी दहा गुणांची कमाई केली. शिवम पाठारे (१०) आणि विशाल ताटे (११) यांनीही चढाईत सुपर टेन साकार करुन आपला वाटा उचलला. शाडलुईने लीगमध्ये ३०० पकडी सर्वात वेगवान करण्याचा विक्रम केला. यू मुंबाकडून केवळ अजित चौहानलाच (१७) यश आले. मात्र उत्तरार्धात तो अपयशी ठरला. यू मुंबाचा बचावही फिका पडला होता. याचा फटका त्यांना बसला.

# हिटमॅन अलिबागमध्ये झाला स्पॉट

## खेळाडूला पाहण्यासाठी चाहत्यांची गर्दी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी रवाना झाला आहे. भारताला २२ नोव्हेंबरपासून ५ कसोटी सामन्यांची बॉर्डर-गावसकर ट्रॉफी खेळायची आहे. या मालिकेसाठी भारतीय संघात निवड झालेले खेळाडू दोन तुकड्यांमध्ये रविवारी आणि सोमवारी ऑस्ट्रेलियाला रवाना झाला आहे. पण एकिकडे भारतीय खेळाडू ऑस्ट्रेलियाला गेले असतानाच भारताचा कर्णधार रोहित शर्मा मात्र अद्याप भारतात आहे. अशातच तो आता नुकताच आलिबागमध्ये दिसून आला आहे



रोहित शर्मा नुकताच अलिबागला गेल्याचा व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे. त्याला चाहत्यांनी घेरलेले दिसून येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार तो आलिबागमधील रजिस्ट्रेशन ऑफिसमध्ये स्पॉट झाला होता. याठिकाणी तो त्याच्या जागेच्या निगडीत कामासाठी आल्याचे समजत आहे. रोहितने आलिबागमध्ये जागा घेतली आहे.तिथे तो त्याचे मोठे घरही बांधत आहे.

कुमामोटो मास्टर्स जपान सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धा

# पीव्ही सिंधू आणि लक्ष्य सेन सज्ज

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

कुमामोटो मास्टर्स जपान सुपर ५०० ही बॅडमिंटन स्पर्धा सुरू झाली आहे. याप्रसंगी भारताचे स्टार खेळाडू पी. व्ही. सिंधू व लक्ष्य सेन लय मिळवण्यासाठी प्रयत्नांची शर्थ करताना दिसणार आहेत.



पी. व्ही. सिंधू हिला पॅरिस ऑलिंपिकमध्ये निराशेचा सामना करावा लागला. त्यानंतर फिनलँडमधील स्पर्धेत कॅनडाच्या मिचेल ली हिच्याकडून तिला पहिल्या फेरीतच गारद होण्याच्या नामुष्कीचा सामना करावा लागला. डेन्मार्क ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत तिने प्रवेश केला, पण पॅरिस ऑलिंपिकमध्ये ब्राँझपदक पटकावलेल्या इंडोनेशियाच्या ग्रेगोरिया मरिस्का तुनजुंग हिच्याकडून तिचा पराभव झाला. जपान बॅडमिंटन स्पर्धेतील सलामीच्या लढतीत तिच्यासमोर थायलंडच्या बुसानन ओ. हिचे आव्हान असणार आहे.

सिंधूप्रमाणेच लक्ष्य सेनचीही तीच परिस्थिती आहे. पॅरिस ऑलिंपिकमध्ये पदकापासून थोडक्यासाठी दूर राहिल्यानंतर चीन तैपईच्या चोऊ टिएन चेन याच्याकडून त्याला फिनलँडमधील स्पर्धेत हार पत्करावी लागली, तसेच डेन्मार्कमध्ये चीनच्या लू झू याने भारतीय खेळाडूला नमवले. आता लक्ष्य सेन याला पहिल्या फेरीत मलेशियाच्या लियाँग हाओ याचा सामना करावयाचा आहे. या फेरीत विजय मिळवल्यास लक्ष्य सेनला आठव्या मानांकित इंडोनेशियाच्या अँथोनी गिनटिंग याच्याशी दोन हात करावे लागणार आहेत.

गेल्या काही दिवसांमध्ये अनूप श्रीधर, ली स्यून यांच्या मार्गदर्शनात विविध बाबींवर लक्ष देण्यात आले. वेग, बचाव यांसारख्या गोष्टींवर मेहनत घेण्यात आली. आता मी मानसिक व शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त आहे. जपान व चीनमधील स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करण्याची आशा बाळगते, असे सिंधू म्हणाली.

पी. व्ही. सिंधू व लक्ष्य सेन या दोघांव्यतिरिक्त या स्पर्धेमध्ये भारताचे दोन खेळाडू सहभागी होणार आहेत. ट्रीसा जॉली-गायत्री गोपीचंद ही जोडी महिला दुहेरीत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. या भारतीय जोडीला सू यिन-लिन यून या जोडीचा सामना करावयाचा आहे.

# मोहम्मद शमी कमबॅक करणार!

नवी दिल्ली : जलगदती गोलंदाज मोहम्मद शमी एकदम तंदुरुस्त झाला असून तो जवळपास वर्षभरानंतर मैदानात उतरण्यास तयार आहे. 'बॉर्डर-गावसकर ट्रॉफी स्पर्धेआधी टीम इंडियासाठी ही आनंदाची बातमी आहे. वनडे वर्ल्ड कप स्पर्धेत तो शेवटचा सामना खेळला होता. दुखापतीमुळे त्याला टीम इंडियाकडून देशांतर्गत क्रिकेटच्या मैदानापासूनही दूर राहावे लागले. आता रणजी करंडक स्पर्धेतून तो कमबॅक करणार आहे. रणजी करंडक स्पर्धेतील एलीट ग्रुप सीमध्ये पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश यांच्यातील सामना १३ नोव्हेंबरला रंगणार आहे. या सामन्यासाठी पश्चिम बंगालच्या संघात शमीच्या नावाचा समावेश करण्यात आला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)